जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## 'राहुरी विधानसभा पोटनिवडणुकी'साठी भाजप पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक; अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देण्याची मागणी

नगर – राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक बुऱ्हाणनगर येथे झाली. या बैठकीत कार्यकर्त्यांनी अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीची मागणी केली.

या बैठकीत भाजपचे संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे यांनी कार्यकर्त्यांना दिशा देत सांगितले की, ही निवडणूक फक्त राजकीय नाही, तर श्रद्धेची आणि वारशाची लढाई आहे. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे कार्य, त्यांचा जनसंपर्क आणि जनतेतील नाळ आजही जिवंत आहे. त्यांना खरी श्रद्धांजली म्हणजे आपला उमेदवार एक लाख मतांच्या फरकाने विजयी करणे!


राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या तयारीसाठी आयोजित भाजपा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे. (छाया – लहू दळवी)

रवींद्र अनासपुरे पुढे म्हणाले, राहुरी, पाथर्डी आणि नगर तालुक्यांमध्ये आपल्याला मते वाढवायची आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत आपण थोडे मागे राहिलो, पण आता ती चूक पुन्हा होऊ देऊ नका. प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात जाऊन मतदारांशी संवाद साधावा, मतदार यादींचा सखोल अभ्यास करावा. ते पुढे म्हणाले, स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांचा वारसा म्हणजे जनतेच्या हृदयात वसलेली माणुसकी आणि कार्यसंस्कृती. त्या वारशाचा खरा वारसदार म्हणजे अक्षय कर्डिले आहेत. ते अभ्यासू, कर्तृत्ववान आणि जनतेत स्वीकारार्ह आहेत.

बैठकीत अक्षय कर्डिले म्हणाले, राहुरी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाशी माझे नाते हे केवळ राजकीय नाही, तर कौटुंबिक आहे. माझे वडील नसताना माझ्या राजकीय प्रवासाची सुरुवात होईल असं मी कधीच विचार केला नव्हता. पण कार्यकर्त्यांनी दाखवलेले प्रेम आणि विश्वास मला नव्याने बळ देत आहे.

ते पुढे म्हणाले, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी आम्हाला शिकवले की निवडणूक कधीच हलक्यात घेऊ नये. कार्यकर्त्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि एकजुटीने काम करावे. गेल्या चार महिन्यांपासून मी जनतेच्या सुखदुःखात सहभागी होत आहे. जनतेने वडिलांवर केलेलं प्रेम आज माझ्यावरही करत आहे, हीच आमच्यासाठी खरी ताकद आहे.

अक्षय कर्डिले यांनी सांगितले की, ही निवडणूक आपण संघटितपणे लढवायची आहे, आणि विजय निश्चित आहे. स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या ३० वर्षांच्या कार्याची पावती या निकालातून मिळेल. बैठकीदरम्यान उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीची मागणी केली. आणि त्यांना विजयी करण्याची ग्वाही दिली.

या बैठकीस संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे, अक्षय कर्डिले, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहराध्यक्ष अनिल मोहिते, भाऊसाहेब बोठे, काशिनाथ लवांडे, बाजीराव गवारे, बाळासाहेब अकोलकर, संभाजी पालवे, संदीप कर्डिले, अर्जुन पानसंबळ, अण्णासाहेब बाचकर, रंगनाथ गवते, विक्रम भुजाडी, धनंजय आढाव, युवराज गाडे, बाळासाहेब महाडिक, प्रसाद डोकरीकर, श्याम पिंपळे, दादा बोटे, मीराताई बांगर, समीर पठाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## उड्डाणपुलाच्या खांबांवर जाहिरातबाजी केल्याने गुन्हा दाखल

नगर – शहराचे सौंदर्य बिघडवत सार्वजनिक मालमत्तेवर विनापरवाना जाहिरातबाजी करणाऱ्या एकावर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्टेशन रोडवरील उड्डाणपुलाच्या खांबांवर बेकायदेशीर जाहिरात फलक लावल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी शेख अजीम यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. मार्केटयार्ड चौक ते कोठी चौक दरम्यान असलेल्या उड्डाणपुलाच्या खांबांवर 'ओम साई डेव्हलपर्स'च्या वतीने प्लॉट विक्रीची विनापरवाना जाहिरातबाजी करण्यात आली होती. यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण झाले आहे.

याप्रकरणी पोलिसांनी ऋषी गोरक्ष गोते (रा. उरळी कांचन) याच्यावर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा नोंदविला आहे. विनापरवाना फलक लावून शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्यांविरुद्ध महापालिकेकडून कडक भूमिका घेतल्याने संबंधित अशा प्रकारे जाहिरातबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत. शहरातील अनधिकृत जाहिरातबाजीला आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने मोहिमा राबवल्या जात असूनही असे प्रकार घडत आहेत.

## दुकानातील चोरीचा तपास न लागल्याने व्यापारी वर्गातून पोलिसांबद्दल नाराजी

### तातडीने उलगड न झाल्यास आंदोलन करणार : अधीक्षकांना देणार निवेदन

नगर – बोल्हेगाव येथील किराणा व्यवसायिक नंदकिशोर दागडिया यांच्या दुकानात झालेल्या चोरीच्या घटनेला पंधरा दिवसांचा कालावधी उलटून गेला असतानाही पोलिसांना अद्याप ठोस यश मिळालेले नाही. त्यामुळे बोल्हेगाव परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असून, चोरीचा तातडीने उलगडा करावा अशी मागणी व्यापारी संघटनेकडून जोर धरत आहे.

काही दिवसांपूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दागडिया यांच्या किराणा दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला होता. दुकानातील रोकड लंपास करण्यात आला. सकाळी दुकान उघडण्यासाठी आले असता ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला; मात्र त्यानंतर तपासाची गती मंदावल्याची भावना व्यापाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

आज दागडिया यांच्या दुकानात चोरी झाली, उद्या आमच्याही दुकानावर डल्ला पडू शकतो, अशी चिंता व्यापाऱ्यांमधून व्यक्त होत आहे. घटनेला पंधरा दिवस उलटूनही आरोपी मोकाट आहेत, ही गंभीर बाब आहे. व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, असे मत काही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर बोल्हेगाव परिसरातील व्यापारी लवकरच एकत्र येऊन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन देणार असल्याची माहिती समोर आली आहे. निवेदनाद्वारे चोरीचा तातडीने उलगडा करावा, गस्त वाढवावी तसेच व्यापारी भागात रात्रीच्या वेळी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवावा, अशी मागणी केली जाणार आहे.

दरम्यान, स्थानिक पोलिसांकडून तपास सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र ठोस कारवाईचा अभाव असल्याची टीका व्यापारी वर्गातून होत आहे. बोल्हेगाव परिसरात यापूर्वीही किरकोळ चोरीच्या घटना घडल्या असल्याची चर्चा असून, त्यांचा उलगडा तातडीने न झाल्यास व्यापारी वर्ग रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा देत आहे.

व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गांभीर्याने घेत पोलिस प्रशासनाने या प्रकरणात जलद कारवाई करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

## ६ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीनिमित्त 'शिव शंकराचा अवतार तू' या देखाव्याचे आयोजन

### छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानचा दिल्लीगेट येथे उपक्रम

नगर – छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ६ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या जयंतीनिमित्त दिल्लीगेट येथे 'शिव शंकराचा अवतार तू' हा भव्यदिव्य देखावा उभारण्यात येणार आहे. हा देखावा छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने साकारला जात असून, मुंबई येथील कलाकार गणेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची उभारणी सुरू आहे. देखाव्याच्या उभारणीच्या कामाचे भूमिपूजन माजी नगरसेवक श्रीकांत छिंदम यांच्या हस्ते झाले. शिवजयंती–निमित्त नागरिकांना एक नेत्रदीपक व ऐतिहासिक सोहळ्याची अनुभूती देण्याचा प्रतिष्ठानचा मानस आहे, अशी माहिती छत्रपती शिवाजी महाराज सामाजीक प्रतिष्ठानचे संस्थापक नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी दिली.


शिवजयंतीनिमित्त दिल्लीगेट येथे छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या 'शिव शंकराचा अवतार तू' हा भव्यदिव्य देखाव्याच्या कांचे भूमिपूजन करताना माजी नगरसेवक श्रीकांत छिंदम.

अधिक माहिती देताना प्रतिष्ठानचे मयूर बोडखे म्हणाले, दिल्लीगेट येथे उभारण्यात येणारा हा देखावा तब्बल ७० फूट लांब, ४० फूट रुंद आणि ५१ फूट उंच असा भव्यदिव्य असेल. या देखाव्यात रायगड किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारण्यात येणार असून, शिवकालीन बुरुज, महाद्वार, राजवाडा, शस्त्रे, तोफा आणि मावळ्यांच्या प्रतिकृतींचा समावेश असेल. देखाव्याच्या सर्वात वरच्या भागात भगवान शंकरांची १८ बाय २५ फूट उंच भव्य मूर्ती उभारण्यात येणार असून, सिंहासनाधीश छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा, आकर्षक विद्युत रोषणाई व आतषबाजी हे या देखाव्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. सध्या या भव्य देखाव्याच्या उभारणीचे काम वेगाने सुरू आहे.

शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज सामाजीक प्रतिष्ठानच्या या भव्यदिव्य देखाव्यानिमित्त दिलीगेट येथे लाठीकाठी, ढाल–तलवार तसेच मल्लखांब अशा विविध चित्तथरारक मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिके सदर केली जाणार आहेत, अशी माहिती किशोर हरबा यांनी दिली.

देखाव्याच्या भूमिपूजन कार्यक्रमास छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक प्रतिष्ठानचे संजय वल्लाकट्टी, अमोल बोल्ली, महेश सब्बन, शहीद शेख, रोहन येनगुंदुल, उमेश मेरगू, सागर लोढा, अमृत वन्नम, अक्षय माथेसुळ, संजय आकुबत्तीन, हेमंत गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## दुचाकीस्वाराकडून वाहतूक पोलिसाला मारहाण

नगर – नगर शहरात कर्तव्य बजावत असलेल्या वाहतूक पोलिसावर दुचाकीस्वाराने हात उचलल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कायनेटीक चौकात ही घटना घडली असून, या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार गणेश मोहन शिंदे हे १ मार्च रोजी सायंकाळी कायनेटीक चौकात वाहतूक नियमनाचे कर्तव्य बजावत होते. यावेळी दोन दुचाकीस्वार रस्त्याच्या मधोमध गाडी उभी करून वाद घालत होते. यामुळे वाहतुकीची कोंडी होत होती. हा वाद सोडवण्यासाठी हवालदार गणेश शिंदे यांनी मध्यस्थी केली असता, आरोपी अजित बाळासाहेब भोगाडे (वय २२, रा. साकत बु, ता. आष्टी, जि. बीड) याने पोलिसांशी हुज्जत घातली. त्याने हवालदार गणेश शिंदे यांची गचांडी धरून त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली.

दरम्यान, घटनास्थळी उपस्थित इतर कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेत पोलिसाची सुटका केली. त्यानंतर कोतवाली पोलीस ठाण्याचे अंमलदार दिपक मिसाळ यांच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेण्यात आले. सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आरोपी अजित बाळासाहेब भोगाडे याच्यावर पोलीस ठाण्यात कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. भररस्त्यात पोलिसावर झालेल्या या हल्ल्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## बसस्थानकात महिला एसटी वाहकास मारहाण

नगर – येथील स्वस्तिक बसस्थानकामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या महिला वाहकास मारहाण झाल्याची घटना घडली. बस उभी करताना इशारा देणाऱ्या वाहकास शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१ मार्च रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास स्वस्तिक बसस्थानकामध्ये ही घटना घडली. चालक बस उभी करत असताना, महिला वाहक खाली उतरून त्यांना इशारा देत होत्या. यावेळी तिथे आलेल्या किसन रामकिसन धनवटे (मूळ रा. देहरे, ता.नगर, हल्ली रा.सावेडी) याने बसबाबत विचारणा केली. वाहकाने काही क्षण थांबण्यास सांगितले असता, त्याला राग अनावर झाला.

संबंधित इसमाने महिला वाहकाला अश्लील शिवीगाळ केली. एवढेच नाही तर, त्याने महिलेचा शर्ट पकडून हाताने मारहाण केली. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली. उपस्थित सुरक्षारक्षकांनी मध्यस्थी करून मारहाण करणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले. या घटनेमुळे सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी किसन धनवटे याच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## जनाबाई खर्से यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – कौडगाव येथील रहिवासी श्रीमती जनाबाई नामदेव खर्से (वय ९१) यांचे १ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कौडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


त्यांच्या मागे २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आबा व बाबासाहेब खर्से यांच्या त्या मातोश्री होत.

## दिगंबर कांबळे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील दिगंबर बाबुराव कांबळे (वय ७६) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संगमनेररोड येथील कांबळे सोडा फॅक्टरी व कांबळे सर्व्हिस स्टेशनचे मालक संतोष व सचिन कांबळे यांचे वडील होत.



## हनुमान चालिसा पाठ

**मंगळवार दि. ३/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**रेणुकामाता मंदीर, केडगाव देवी,** केडगाव देवी मंदिर समोर अजीत कोतकर ९०४९४६५५५५, पंकज जपे ९६१५२३१५१५, शैलेश बोरुडे ९५११११३०३५

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**जयंत परीख,** सुरभी ट्रेडर्स, आडते बाजार, जयंत परीख ९५११७२६८९१

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**जुगलकिशोर अविनाश झंवर,** १८, आशिष बंगलो, संजय सुपर मार्केटच्या पाठीमागे, आनंदनगर, गुलमोहोर रोड, ९८९००६५०००

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**श्री पावन गणपती मंदिर,** संतोष दिलीपशेठ ठाकुर परिवार, ठाकुरगल्ली, तोफखाना

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## गावठी कट्टे बाळगणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पकडले

### एका आरोपीवर ९ तर दुसऱ्यावर विविध पोलीस ठाण्यांत १८ गुन्हे आहेत दाखल

नगर – नेवासा तालुक्यातील वांजोळी व घोडेगाव येथे गावठी कट्टा बाळगणाऱ्या दोघा आरोपींकडून २ गावठी कट्टे व ४ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. अटक केलेल्या एका आरोपीवर ९ तर दुसर्या आरोपीवर विविध पोलीस ठाण्यांत १८ गुन्हे असे दोघांवर २७ गुन्हे दाखल आहेत.


गावठी कट्टे बाळगणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे, दीपक घाटकर, फुरकान शेख, बिरप्पा करमल, बाळासाहेब नागरगोजे भिमराज खर्से, बाळासाहेब खेडकर, किशोर शिरसाठ, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, प्रशांत राठोड, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक भगवान धुळे, अरुण मोरे यांचे पथकाने सोनई पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध शस्त्रे बाळगणारे इसमांची माहिती काढत असताना पथकास गुप्त बातमीदारामार्फत नितीन उर्फ ठकन भाऊसाहेब आल्हाट रा. मोरेचिंचोरे ता.नेवासा हा चारचाकी वाहनातून गावठ्ठी कट्टा विक्री करण्यासाठी वांजोळी शिवारात येणार असल्याची माहिती प्राप्त झाली.

त्यानुसार पथक वांजोळी शिवारात सापळा लावून थांबले असता वांजोळीकडुन एमआयडीसीकडे एक पांढऱ्या रंगाचे चारचाकी वाहन येताना दिसले. पथकाने वाहन थांबविले असता चालक वाहन थांबवून पळुन जावू लागला तेव्हा पथकाने त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. याने त्याचे नाव नितीन उर्फ ठकन भाऊसाहेब आल्हाट (वय ३४) रा. मोरेचिंचोरे ता.नेवासा असे असल्याचे सांगितले. ताब्यातील इसमाची व कारची झडती घेतली असता त्याचे कब्जातून ३० हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल, एक हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे, ५ लाख रुपये किमतीचे मारुती सुझुकी चारचाकी वाहन असा ५ लाख ३१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसऱ्या घटनेत स्थानिक गुन्हा शाखेचे पथक घोडेगाव शिवारात सापळा लावून थांबले असता. राजेगावकडून घोडेगावकडे एक पांढर्या रंगाचे चारचाकी वाहन येताना दिसले. तेव्हा पथकाने चारचाकी वाहन थांबवून चालकास ताब्यात घेवून त्याचे नांव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नांव शाहरुख उर्फ चाट्या जावेद शेख (वय ३१) रा. कृष्णानगर झोपडपट्टी घोडेगाव ता. नेवासा असे असल्याचे सांगितले. ताब्यातील इसमाची व कारची झडती घेतली असता त्याचे कब्जातून ३० हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल, एक हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे व ४ लाख रुपये किमतीचे मारुती सुझुकी चारचाकी वाहन असा एकूण ४ लाख ३१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## स्वस्तामध्ये सोने देण्याचे अमीष दाखवून लुटणारी टोळी जेरबंद

### रोख रक्कम हस्तगत, न्यायालयाने सुनावली ५ मार्च पर्यंत पोलिस कोठडी

नगर – स्वस्तात सोने देतो असे सांगून एकाला मारहाण करत सुमारे पाच लाखांची लुट करणाऱ्या टोळीतील दोघांना बेलवंडी पोलिसांच्या पथकाने पाठलाग करून पकडले आहे. त्यांच्याकडून लुटीतील काही रक्कम हस्तगत करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना ५ मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २८ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास कोळगाव शिवारातील सिक्रेट हार्ट इंग्लिश मीडियम स्कूलच्या समोरील बाजूस मोकळ्या मैदानात फिर्यादी अविनाश दिनकर शिंदे (रा. कडाचीवाडी, चाकण, ता. खेड जि. पुणे व त्याचा मित्र नरेंद्र ठाकूर यांना पाच लाख रुपयात अडीचशे ग्रॅम स्वस्तात सोने घेऊन देतो असे सांगून त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना बोलावून सदर ठिकाणी अनोळखी महिला व दहा ते बारा जणांनी त्यांना लाथा बुक्क्याने मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम पाच लाख, दोन मोबाईल त्यामध्ये आयफोन व विवो कंपनीचा व नरेंद्र ठाकूर यांच्याकडील बॅग त्यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन एटीएम कार्ड असे बळजबरीने चोरून घेऊन पळून गेले होते. याबाबत बेलवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकारा बाबत माहिती मिळताच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या योग्य सूचना व मार्गदर्शनाखाली तत्काळ सदर ठिकाणी बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर व पोलीस पथक तात्काळ रवाना झाले. सदर ठिकाणच्या परिस्थितीवरून व मिळालेले माहितीनुसार आरोपी यांचा शोध घेत असताना कोळाई देवी मंदिराच्या जवळ निजाम जलद्या काळे (रा.पारगाव, ता. श्रीगोंदा) व सुयोग बाजऱ्या काळे (रा. कोळगाव, ता. श्रीगोंदा) या दोघांना पाठलाग करून पकडण्यात आले. त्यांची अंगझडती घेतल्या असता त्यांच्याकडे काही रक्कम मिळून आली. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. या दोघांनाही न्यायालयात हजर केलें असता न्यायालयाने ५ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास बेलवंडी पोलीस स्टेशनचे स.पो.नि.नंदकुमार सोनवलकर हे करत आहेत.


स्वस्तामध्ये सोने देण्याचे अमीष दाखवुन लुटणारी टोळी जेरबंद केल्यानंतर त्यांच्यासमवेत बेलवंडी पोलिस ठाण्याचे पथक.

# गृहिणी

## आरोग्य

### दही आहे पौष्टीक परंतु...

दही स्वादिष्ट असल्यासोबतच पोषक तत्वांनी भरपूर असते. दही हे शरीरातील प्रोटीनच्या कमीला भरून काढते. पण तुम्हाला माहित आहे का दह्यासोबत सर्व पदार्थ सेवन करू शकत नाही. असे काही पदार्थ आहे जे आपण दहीसोबत सेवन करू शकत नाही. मासे याबरोबर कधीही दही सेवन करू नये. दोघांमध्ये प्रोटीन असते पण दोघांची प्रकृती वेगवेगळी असते. या दोघांचे सोबत सेवन केल्याने पोटात इंफेक्शन, उलटी, बद्धकोष्ठता होऊन सोबत तब्येत पण खराब होते. आंबा या फळाला दही सोबत सेवन केल्यास आपल्याला फूड पॉइजन होण्याची शक्यता असते. दोघांची प्रकृती वेगळी असते. आंबा गरम असतो आणि दही थंड असते. अशामुळे पोटात विषारी पदार्थ बणण्याची संभवना असते. ही सोबत कांदा खाणे ही सामान्य गोष्ट आहे. यांचे मिश्रण म्हणून रायता तसेच चटनी तयार करतात. पण हे पोटासाठी घातक आहे या दोघांना एकत्रित सेवन केले तर गॅस आणि एसिडिटीची समस्या वाढते. दहीला दुधासोबत पण काही सेवन करतात मात्र यांची पण वेगवेगळी प्राकृती असल्याने यांना सोबत सेवन करणे घातक असते यामुळे अपचन होऊ शकते.

## पाककला

### रताळ्याचा गोड शिरा

**साहित्य –** २ मोठी रताळी, अर्धा कप साखर किंवा गुळ, अर्धा कप दूध, २ चमचे साजूक तूप, वेलची पूड, काजू-बदामाचे काप

**कृती –** सर्वात आधी रताळी उकडून, सोलून आणि नीट मॅश करून घ्या. कढईत तूप गरम करून त्यात रताळ्याचा गर ५-७ मिनिटे परता.

त्यात दूध आणि साखर घालून नीट मिक्स करा. मिश्रण दाट झाले की त्यात वेलची पूड आणि ड्राय फ्रूट्स घालून गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### कार पार्कींगसाठी दिशा

✻ वास्तुनुसार, आग्नेय किंवा वायव्य बाजू गॅरेजसाठी सर्वोत्तम आहे. उत्तर किंवा पूर्वेकडे पार्किंग करू नका, कारण ते झोन प्रकाश आणि हवेच्या प्रवाहासाठी खुले असले पाहिजेत. कारसारख्या वस्तू चुकीच्या ठिकाणी ठेवल्यास ऊर्जा रोखू शकतात.

✻ शक्य असल्यास दरवाजा उत्तरेकडे किंवा पूर्वेकडे उघडेल याची खात्री करा. नैऋत्य दिशा देखील चांगली आहे. गॅरेज नैऋत्येकडे असले तरीही या दिशा प्रकाश आणि ताजी हवा आणतात.

✻ गाडी किंवा दुचाकी पार्क करताना नेहमी दिशा लक्षात ठेवा. गाडी थेट दक्षिणेकडे तोंड करून पार्क करू नका. उत्तर किंवा पूर्व कडे तोंड करून पार्किंग करणे आदर्श आहे कारण त्यामुळे ऊर्जा प्रवाह चांगला होतो.

## सौंदर्य

जर तुम्हाला तुमच्या हातांना एक आकर्षक आणि ट्रेंडी लूक द्यायचा असेल, तर मॅट पिंक नेल आर्ट हा एक उत्तम पर्याय आहे. तुम्ही ते साधे ठेवू शकता, जसे की एक किंवा दोन नखांवर किमान सोनेरी किंवा पांढरी रेषा डिझाइन. जर तुम्हाला थोडी सर्जनशीलता जोडायची असेल, तर तुम्ही फुलांचे नमुने, ठिपके किंवा रेषा देखील वापरून पाहू शकता.

## सल्ला

जर तुमची कंपनी परवानगी देत असेल, तर १० ते १५ मिनिटांची एक छोटी डुलकी घेणे खूप फायदेशीर ठरते. ही छोटी विश्रांती तुमच्या मेंदूला 'रीबूट' करते, ज्यामुळे तुम्ही पुढचे काही तास अधिक चांगल्या प्रकारे काम करू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३ मार्च २०२६

**धूलिवंदन, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, मघा ०७।३२, सूर्योदय ०६ वा. ३६ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील.

**वृषभ** : जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**कर्क** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**सिंह** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**कन्या** : आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थिती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल.

**तूळ** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**वृश्चिक** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा.

**धनु** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**मकर** : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**कुंभ** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**मीन** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

## शब्दगंध क्र. ७३७८

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ■ | ३ | | ४ |
| ५ | | ■ | ६ | ७ | | ■ | |
| ८ | | | | | | ■ | |
| ९ | | ■ | | ■ | १० | ११ | |
| ■ | १२ | १३ | ■ | १४ | ■ | | ■ |
| १५ | ■ | १६ | | | ■ | ■ | १७ |
| १८ | १९ | | ■ | २० | | २१ | |
| २२ | | | | | ■ | २३ | |

**आडवे शब्द :-** १) शारीरिक व्यंग असलेला; पंगू; दिव्यांग ३) रागाचा अतिरेक; रागाचा आवेश ५) हत्या; खून ६) कक्ष; खोली; डिपार्टमेंट; दालन ८) शत्रूला वेड लागावे किंवा त्याला मरण यावे म्हणून केला जाणारा मंत्रप्रयोग ९) नाद; आवाज; ध्वनी १०) दार; दरवाजा; द्वार १२) पोस्ट; टपाल; मेल १६) मौज; रंग; मजा; आनंद १८) घट्ट धरून ठेवण्याचे हत्यार; चिमटा २०) घोटाळा; प्रस्थ; धेंड २२) कोरा; न लिहिलेला (कागद) २३) पोळी, भाकरी वगैरे ज्यावर भाजतात ते स्वयंपाकघरातील पात्र

**उभे शब्द :-** १) शीड; कारागिराचे हत्यार २) पंधरा दिवसांचा समूह; पक्ष ३) कॉम्प्युटरचे मराठी रूप ४) दुर्दशा; दैना ६) आकाशातून जाणारे एक वाहन ७) ओझे; वजन ११) इमारत; बिल्डिंग; भवन १३) चषक; कप; ढाल (खेळातील) १४) रिवाज; रीत; तऱ्हा; पद्धत १५) बेचव; अळणी; पाणचट १७) प्रतिपदा; वर्षप्रतिपदा १९) हात; महसूल; हस्त; सारा २१) गेलेला; अवस्था; भूत; दशा

### शब्दगंध क्र. ७३७७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यं | क | ट | रा | ध | व | न | ■ |
| क | ■ | वा | स | ■ | सा | ग | र |
| टे | ह | ळ | ण | ■ | ■ | र | ■ |
| श | र | ■ | ■ | व | [illegible] | र | ■ |
| ■ | दा | स | बो | ध | ■ | वा | ट |
| वे | स | क | र | ■ | प | नी | र |
| त | ■ | वा | मा | ■ | सं | ■ | फ |
| ■ | स | र | ळ | ■ | त | र | ल |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : काटकसरी माणूस गरीब दाखवत श्रीमंत होतो तर उधळा माणूस श्रीमंती दाखवत गरीब होतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### घड्याळाचे काटे नेहमी उजवीकडे का फिरतात; याचे उत्तर माहित आहे का तुम्हाला?

तुम्ही सर्वांनी घड्याळे पाहिली असतील आणि वापरली असतील. घड्याळाचे काटे उजवीकडून डावीकडे फिरतात हे तुमच्या लक्षात आले असेल. असे का घडते हे तुम्ही कधी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे का? आज आपण याबद्दल जाणून घेणार आहोत.

घड्याळाचे काटे नेहमी उजवीकडे का वळतात?

घड्याळाचे काटे नेहमी उजवीकडे का वळतात हे समजून घेण्यासाठी, आपल्याला ग्रीक काळाकडे परत जावे लागेल. तेव्हाच सूर्यघड्याळांचा शोध लागला. त्या वेळी, ग्रीक लोक उत्तर गोलार्धात राहत होते, जिथे सूर्य पूर्वेकडून पश्चिमेकडे आकाशात फिरतो आणि दक्षिणेकडून जातो. म्हणूनच सूर्यघड्याळावरील सावली डावीकडून उजवीकडे सरकते आणि एका स्थिर रॉडने टाकलेल्या सावलीचा वापर करून, त्यांना आढळले की काळाच्या प्रवाहाचे निरीक्षण करणे शक्य आहे.

सूर्यघड्याळाची सावली आज घड्याळाच्या काट्यांप्रमाणेच रॉडभोवती फिरते.

जेव्हा १२ व्या आणि १५ व्या शतकात पहिले घड्याळे बनवले गेले, तेव्हा कदाचित ही दिशा सवयीबाहेर आणि ग्रीक लोकांच्या शोधांचे अनुसरण करण्यासाठी निवडली गेली असेल.


### मोत्याचे झाड

एकदा अकबराने त्याच्या दरबारींना विचारले की त्यांनी कधी खोटे बोलले आहे का? अकबराच्या रागाने दरबारी घाबरले. त्यांनी खोटे बोलले, त्यांनी कधीही खोटे बोलले नाही असे सांगितले. पण जेव्हा बिरबलने खोटे बोलल्याचे कबूल केले तेव्हा अकबराने त्याला कायमचे राज्य सोडण्याचा आदेश दिला.

काही दिवसांनी बिरबल अकबराला भेटायला आला. त्याला पाहून तो खूप आनंदी झाला.

बिरबल म्हणाला, महाराज, मी राज्य सोडत होतो. तेव्हाच, मला एक प्रवाशाची भेट झाली. त्याने मला हे मोती दिले. त्याने सांगितले की जर ते पेरले तर ते मोत्याचे झाड बनतील. अकबर आनंदित झाला आणि त्याने बिरबलला मोती लावण्यास सांगितले. पण बिरबल म्हणाला, ज्याने कधीही खोटे बोलले नाही तोच ते पेरू शकतो. तुमचे दरबारी ते पेरू शकतात. दरबारी खोटे बोलले आहेत हे जाणून त्याने स्वतः ते पेरण्यास नकार दिला.

मग बिरबल म्हणाला, महाराज, तुम्ही ते पेरू शकता कारण तुम्ही कधीही खोटे बोलले नाही. बिरबल, मी माझ्या लहानपणी खूप खोटे बोललो. आता अकबराला त्याची चूक कळली आणि त्याने बिरबलला माफ केले.



## जीवन का अमृत (भाग १)

### प्रेरणादायी

शरीर में काम करता है, ताकि जो लोग इस भौतिक मंडल में रह रहे हैं, वे अंतर में 'अदृष्ट' (प्रभु) को देखने का मौका पा सकें ।

वह ऐसा ध्रुव है, जिस पर उच्चतर शक्ति कार्य करती है। वह आत्मा को भौतिक स्तर से ऊपर उठाता है और शिष्य की आँख खोलता है, ताकि अंतर में उस महाशक्ति को कार्यरत देखा जा सके। वह लक्ष्य को पाने का साधन है।

पूरा विश्वास तभी आता है, जब वह अंतर में देखने लग जाता है। दूसरों के सतुर हमें केवल इस रास्ते पर चलने के लिए प्रेरित कर सकते हैं, पर स्वयं के अनुभव से ही विश्वास बनता है, चाहे वह कितना भी छोटा क्यों न हो ।

२९. जो प्रेम और गंभीरता से, जैसा बताया गया है, वैसा करेंगे, वे अवश्य ही इसी जिंदगी में रूहानी तरक्की पाएँगे। सिर पर कार्यरत गुरु-सत्ता यह देखने के लिए बहुत बेचैन है कि उसके बच्चे अंतर में उसके पास आयें और उन मंडलों की जगमगाती शांति और आनंद का मजा लें, जहाँ पर वे अपने सतुरु के नूरी और लुभावने स्वरूप द्वारा पहुँचा दिए जाएँ । नामलेवा और उसके सतुरु के बीच किसी को भी न आने दो ।

३२. दुख और भ्रम के इस संसार में, हर नामलेवा द्वारा, उसके सिर पर कार्यरत गुरु-सत्ता के मार्गदर्शन का आनंद उठाना वास्तव में प्रेरणादायी है। एक प्यारे पिता की भाँति, वह हमेशा अपने बच्चों के फायदे के लिए कार्य करता रहता है, चाहे वे इसे जाने या ना जाने, हालाँकि कई बार वे जान जाते हैं और इसे बहुत साफ-साफ महसूस करते हैं।

३३. सतुरु शिष्य के प्रिय और नज़दीकी लोगों की भी सँभाल करता है, उनकी रक्षा करता है और उनके सर्वोत्तम हितों की देखभाल करता है।

३०. दयालु सतुरु नामलेवा का सबसे नजदीकी और सदा का साथी है। वह आपकी आंतरिक प्रार्थनाओं और भक्ति से पूरी तरह वाकिफ है कृपया भरोसा रखो, दयालु सतुरु-शक्ति अपने बच्चों को, इस लोक या परलोक में, न कभी भूलेगी और न ही कभी छोड़ेगी ।

३१. जब एक शिष्य सतुरु के नजदीक आता है, तो शिष्य उसके वातावरण का असर अपनी ग्रहणशीलता के अनुसार महसूस करता है। जब वह संत-मत की तालीम को समझ जाता है और रास्ते पर चलने लग जाता है, तो शुरू-शुरू में, हो सकता है, वह इसे एक प्रयोगात्मक रूप में ही।

३४. एक समर्थ सतुरु की सहायता से, अंतर्मुख होने की और आत्म-विश्लेषण की प्रक्रिया का, बहुत आसानी और सहजता से अभ्यास किया जा सकता है ।

३५. यह शिष्य के अपने हित में है कि वह प्रेम, पवित्रता और सादगी की जिंदगी जीए। इससे शांति मिलती है और अंतर में तीव्र उन्नति में सहायता मिलती है। सतुरु हर एक को उचित व्यवहार और दिन-ब-दिन

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

शिवानीदीदी : कारण त्या संभाषणात, संभाषणाव्यतिरिक्तही असं काहीतरी होतं. जे तुम च्यापर्यंत पोहोचत होतं. ते अदृश्यही होतं आणि ऐकू न येणारंही होतं. तुम्हाला समोरच्या व्यक्तीचे नकारात्मक विचार, भावना आणि तरंग जाणवत होते. ते तुमच्यापर्यंत पोहोचत होते आणि त्यांच्या प्रेमळ शब्दांच्या हावभावांच्या प्रभावाला पूर्णतः उलटवत होते. नाती ही तुम्ही इतरांशी काय बोलता किंवा त्यांच्यासाठी काय करता यावर नाही तर तुम्ही इतरांबद्दल काय विचार करता यावर अवलंबून असतात, या विश्वासासह एक प्रयोग करू या.

सुरेश ओबेरॉय : आत्ता तुम्ही जे इतक्या सुंदर पद्धतीने समजावलंत त्याचं मी एक उदाहरण देतो. एकदा मी माझी केशरचना बदलली. त्यानंतर मी एका पार्टीला गेलो. सगळ्यांनी माझ्या त्या केशरचनेचं कौतुक केलं. फक्त एकानेच, ती केशरचना मला शोभून दिसत नसल्याचं सांगितलं. त्याने तशी प्रतिक्रिया दिली तरीही मी दुखावलो नाही. आम्ही सगळा वेळ छान एकत्र घालवला. त्यानंतर मी माझी केशरचना पुन्हा पूर्वीप्रमाणे केली. तुमची मघाची व्याख्या ह्या उदाहरणात एकदम चपखल बसते. नापसंती दर्शवणारा तो एकमेव असला तरी त्याचा त्यामागचा स्वच्छ, शुद्ध हेतू जास्त महत्त्वाचा होता.

एक तंत्र किती चांगल्या पद्धतीने बोलतो ह्यापेक्षा आपण त्यांच्याबद्दल किती चांगला विचार करतो हे महत्त्वाचं असतं. आधी आपल्याला पाया भक्कम करायला हवा आणि मगच आपण नात्याची इमारत बांधण्यावर लक्ष केंद्रित करू शकतो. सहसा आपण आपल्या विचारांचा पाया तसाच (कमकुवत) ठेवतो आणि फक्त शब्दांकडे लक्ष देतो. लहानपणापासूनच आपल्याला बोलायचं कसं आणि वागायचं कसं याचेच धडे दिले जातात.

सुरेश ओबेरॉय : बोलताना घ्लीज' आणि थॅंक यू' असे शिष्टाचार लहान मुलांना शिकवले जातात.

शिवानीदीदी : हो, बोलण्याची आणि वागण्याची कला शिकवणं चांगलंच आहे. विचार करण्याची कला कधीच शिकवली जात नाही.

सुरेश ओबेरॉय : विचार करण्याची कला कुठे शिकता येते ?

शिवानीदीदी : आपणच आपल्या विचारांची पडताळणी करायला हवी कारण आपले विचार इतर कुणालाच कळत नाहीत.

माझ्या मनात कोणते विचार येत आहेत हे फक्त मलाच माहीत आहे, त्यामुळे त्यांना योग्य मार्गावर आणण्याचं काम हे माझं मलाच करावं लागणार. इतरांबद्दल माझ्या मनात येणारे विचार हे त्यांच्याशी तयार होणाऱ्या नात्यांचा पाया आहेत, ही बाब मला माझ्यापुरती स्पष्ट असलीच पाहिजे. आजपर्यंत आपण समजत आलो आहोत की इतरांबद्दल आपण जे विचार करतो ते त्यांना कळत नाहीत. ते आपल्यापुरतेच राहतात. म्हणूनच आपण इतरांबद्दल कोणत्याही थराचे विचार करतो; पण हे करत असताना आपल्या शब्दांना आणि हावभावांना मात्र कुशलतेने सांभाळतो. पण आता आपल्या लक्षात आलं असेल की, इतरांप्रति आपल्या विचारांतून निर्माण होणारी ऊर्जा आपोआपच त्यांच्यापर्यंत पोहोचते. तीदेखील आपल्या शब्दांच्या आणि कमंच्या खूप आधीच.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगी : माझे ह्रदय म्हणजे माझा मोबाईल आहे आणि तू त्यातले सिमकार्ड म्हणजेच जीव आहेस...

मुलगा : राणी एक विचारु...? मुलगी : हो विचार ना...

मुलगा : मोबाईल डबल सिमचा तर नाही ना?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ केंद्र सरकारने देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वर यांना किती वर्षे मुदतवाढ दिली आहे? – २ वर्षे

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

## कलिंगड

उन्हाच्या दिवसांमध्ये निसर्गाने निर्माण केलेले कलिंगड हे फळ आपणा सर्वांसाठी एक वरदान आहे. याच्या दिवसांत प्रखर उष्णतेने अंगाची लाही लाही होते, त्या वेळी कलिंगडाच्या सेवनाने शरीरामध्ये शीतलता प्राप्त होते आणि अति घामामुळे निर्माण झालेला थकवा दूर होऊन उत्साह निर्माण होतो. मधुर, शीतल, तृष्णाशामक आणि उत्साहवर्धक अशा कलिंगडाला मराठीमध्ये कलिंगड, इंग्रजीमध्ये 'वॉटरमेलन' आणि शास्त्रीय भाषेत 'सिट्रलस लॅनेटस' असे म्हणतात.

कलिंगड हे फळ मूळ आफ्रिकेतील आहे. फार प्राचीन काळापासून त्याची लागवड भारतातही केली जाते. कर्नाटकमध्ये सर्वात जास्त कलिंगडाची लागवड होते. त्याच्या अनेक जाती आपल्याकडे प्रचलित आहेत. कलिंगडाची फळे मोठी, काळपट हिरवी, हिरवीगार त्यावर पांढरट किंवा पांढरट रंगावर हिरवट रेषा अशी गुळगुळीत, वाटोळी लंबगोल आकाराची असतात.

औषधी गुणधर्म : कलिंगड हे फळ अल्कली गुणधर्माचे आहे, त्यामुळे आम्लतेने निर्माण होणाऱ्या आजारांवर ते उपयोगी पडते. उन्हाळ्यात प्रचंड उष्णतेने निर्माण होणाऱ्या घामातून शरीरातील जलउत्सर्जन मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे शरीरातील खनिजे घामाद्वारे निघून जातात. पर्यायाने अशावेळी थकवा खूप जाणवतो. अशावेळी उन्हाळ्यात कलिंगड खाल्याने तहान भागते व घामाद्वारे झालेला शरीरातील खनिज द्रव्यांचा -हास भरून येतो. कलिंगडाच्या बियांचा उपयोग शक्तिवर्धक म्हणून करता येतो. कारण या बियांमध्ये 'कुम्बोट्रिन' नावाचा ग्लुकोसाइड घटक असतो. यातील साखर सहज पचून रक्तामध्ये मिसळत असल्याने बिया आरोग्यपूर्ण आहेत.

उपयोग : १) कलिंगड हे मधुर फळांपैकी एक फळ आहे. ते शक्तिवर्धक असून, पौष्टिकही आहे.

२) कलिंगडाची साल, मूळ व बी या तिन्हींचाही उपयोग केला जातो.

३) उन्हाळ्यामध्ये इतर कोल्डड्रिंक्स पिण्यापेक्षा कलिंगड खावे किंवा कलिंगडाचा रस प्यावा. यामुळे शरीरात थंडावा निर्माण होऊन उत्साह वाढतो.

४) कलिंगडामध्ये पाणी व पोटॅशिअमचे प्रमाण हे सर्वात जास्त असते. त्यामुळे मूत्राशयाच्या व वृक्काच्या (किडनी) तक्रारीवर व लघवीला जळजळ होत असेल, तर अशा अवस्थेत कलिंगड खाल्ल्यास उपशय मिळतो.

जर मूतखडा झालेला असेल, तर तो लघवीतून पडून जाण्यासाठी कलिंगडाचा रस सतत काही दिवस द्यावा. कलिंगड हे दाहशामक, पित्तनाशक, उत्साहवर्धक असे फळ आहे. जर आम्लपित्ताचा त्रास होत असेल, तर पित्त कमी करण्यासाठी कलिंगड खावे किंवा त्याचा रस प्यावा.

उन्हातून आल्यानंतर किंवा उष्णतेच्या विकाराने डोकेदुखीचा त्रास होत असेल, तर गर काढलेल्या अर्ध्या कलिंगडाची टोपी डोक्यात घालावी. त्यामुळे डोकेदुखी थांबून शरीरामध्ये थंडावा निर्माण होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



हिंद सेवा मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक. समवेत सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक प्रतिनिधी.

# हिंद सेवा मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी सर्व विषय एकमताने केले मंजूर

## सभासदांच्या दृढ विश्वासावर हिंद सेवा मंडळाची प्रगतीकडे घोडदौड : प्रा.शिरीष मोडक यांचे प्रतिपादन

नगर – हिंद सेवा मंडळ शैक्षणीक संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत विषय पत्रिकेवरील सर्व विषय उपस्थित सभासदांनी एकमताने मंजूर करून ही सभा साधक बाधक चर्चेने उत्साहात झाली. यावेळी मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक प्रतिनिधी व जिल्ह्यातून आलेले सभासद उपस्थित होते.

यावेळी प्रा.शिरीष मोडक म्हणाले, सभासदांच्या दृढ विश्वासावर हिंद सेवा मंडळाची वेगाने प्रगतीकडे घोडदौड सुरु आहे. संस्थेच्या सर्व शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांना अद्यावत सुविधांसह उत्तम ज्ञानदान होत असल्याने विद्यार्थी सर्व क्षेत्रात चौफेर प्रगती करत आहे. संस्थेचे सर्व संचालक, सभासद, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान यामध्ये आहे. संस्थेचा प्रगतीचा चढता आलेख वार्षिक सभेत मांडताना मला अभिमान व समाधान वाटत आहे, असे सांगून विषय पत्रिकेवरील सर्व विषय सभेसमोर मंजुरीसाठी मांडले. उपस्थित सभासदांनी सर्व विषय एकमताने मंजूर केले.

प्रास्ताविकात सचिव संजय जोशी म्हणाले, शतकोत्तर वर्षांची ऐतिहासिक व वैभवशाली परंपरा लाभलेल्या हिंद सेवा मंडळाच्या सर्व शाळा महाविद्यालयांना अद्यावत व डीजीटल शैक्षणिक सुविधा देण्यास संस्था कटिबद्ध आहे. यासाठी लाखो रुपयांच्या निधी उपलब्धतेसाठी संस्था शासनाकडे व दानशुरांकडे पाठपुरावा करत आहे. त्यामुळेच इंग्रजी माध्यमांच्या स्पर्धेतही संस्थेच्या सर्व मराठी शाळा उत्तम प्रगती करत आहे. यामध्ये शिक्षकांचे मोठे योगदान आहे.

या सभेत संस्थेच्या उपाध्यक्षपदी श्रीरामपूरचे रवींद्र गुलाटी, विकास पाथरकर, विलास बडवे व विजय कोठारी या सभासदांची नियुक्ती करून चौघांचा सत्कार करण्यात आला. तसेच नगरसेवकपदी निवडून आल्याबद्दल सभासद अ‍ॅड.ऋग्वेद गंधे व शीतल ढोणे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अ‍ॅड. अनंत फडणीस, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा व अजित बोरा, संचालक सुमतीलाल कोठारी, मधुसूदन सारडा, प्रा. ज्योती कुलकर्णी, डॉ. पारस कोठारी, जगदीश झालानी, विष्णू सारडा, अनिल देशपांडे, रणजीत श्रीगोड, दिलीप शहा, शिक्षक प्रतिनिधी विठ्ठल उरमोडे, गिरीश पाखरे, कल्याण लाकडे, आदिनाथ जोशी व सुनील सुसरे तसेच सहाय्यक सचिव योगेश देशमुख, संदेश पिपाडा व कैलास बालटे आदीसह सभासद उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## 'गण' गातो - नाचतो

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ.रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

रंगमंचावरील कलाविष्काराची सुरुवात ही नांदीने होते, नमनाने होते किंवा गणाने होते. लोकरंगभूमीच्या प्रत्येक प्रकारात 'गण' सादर केला जातो. गण म्हणजे गणपतीचे स्तवन. गणपतीचे वर्णन. त्याच्याही पलीकडे जाऊन सांगायचे झाल्यास 'गण' म्हणजे गणपतीचे लोकसंकीर्तन होय.

गणपती ही विद्येची देवता आहे. ती कलेची देवता आहे आणि सारस्वताचीही देवता आहे. 'आद्य' ज्ञानराशीरूप वेदांनी ज्याचे वर्णन करावे अशा वेदप्रतिपाद्य आणि सर्वांच्या बुद्धिला ज्ञानाचा प्रकाश देणाऱ्या स्वसंवेद्य आत्मरूपी गणपतीला वंदन करून ज्ञानदेव हे ज्ञानेश्वरीच्या महासारस्वताची वागपूजा करतात.

वैदिक परंपरेशी जोडला गेलेला हा अथर्ववेदातील किंवा अथर्वशीर्षातील गणपती लोकमान्य झाल्यावर रिद्धी–सिद्धीसह लोककलेच्या अंगणी येऊन नर्तन करू लागला.

उपनिषदामधील ओंकार रूपापासून पुराणातील शिवसुतापर्यंत, तत्त्ववेत्यांच्या ब्रह्मरूपापासून लोककथांमधील गौरीवंदनेपर्यंत लोकाभिमुख झालेले गणपतीचे रूप लोककलेच्या प्रत्येक आविष्कारात गणाच्या रूपात उभे राहिले शाहिरी, तमाशा, लोकनाट्य, गोंधळ, जागरण, ललित त्या सर्वच लोककलाप्रकारात गणाला आवाहन केले जाते.

आधी गणाला रणि आणिला ।
नाहीतरी रंग पुन्हा सुना सुना ।

असे म्हणत म्हणत गण सादर झाला की कलेमध्ये रंग भरला आणि खरा लोकरंग उभा राहिला, याची अनुभूती कलाकारही घेतो आणि रसिकही. कलाकार रंगमंचावर प्रवेश करतो आणि गणाचे सूर आणि स्वर गाताना तो रंगमंचाशी एकरूप होतो. लोककलाकारांचे रंगमंचाशी असणारे अद्वैत म्हणजे गण.

लोककलावंत त्या रंगमंचावर प्रथम गणरायाशी बोलतो. त्याचा संवाद पहिल्यांदा गणाशी होतो, मग जनाशी...

हे सारे चिंताग्रस्त मन तो गणरायाच्या पायी मोकळे करतो आणि मगच मुक्तपणे रंगमंचावर वावरतो. लोककलावंताचे अंतर्मन व्यक्त करायचे ठिकाण म्हणजे गण. गण हा त्यांचा सखा आहे, दाता आहे. सद्गुरु आणि प्रणेताही आहे. सप्तसुरांचा ताल धरून, संगीताचा शेला विणून तो भावदर्शनाने जेव्हा गणरायाला अर्पण होतो तेव्हाच गण साकारतो. मग 'आम्ही गण गातो... गण नाचतो' ही अनुभूती घेऊन कलावंत आणि रसिकही सुखावतो.

– किशोर गांधी

# दिव्यांग उमेदवारांसाठी नगरमध्ये १० मार्चला 'पंडित दीनदयाळ उपाध्याय' रोजगार मेळावा

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय (अहिल्यानगर), युथ फॉर जॉब्स, ज्योत्स्ना उद्योग केंद्र (कार्यशाळा) आणि भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयांतर्गत असलेल्या नॅशनल करिअर सर्व्हिस सेंटर (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने १० मार्च रोजी सकाळी ११ वाजता दिव्यांग उमेदवारांसाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय' रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा ज्योत्स्ना उद्योग केंद्र, कार्यशाळा (मतिमंद मुलांची शाळा), टिळक रोड, स्वस्तिक चौक, अहिल्यानगर येथे पार पडेल. दिव्यांग उमेदवारांनी रोजगाराच्या याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

या रोजगार मेळाव्यात जिल्ह्यातील १२ ते १५ नामांकित उद्योजक सहभागी होणार असून, ते प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करतील. तसेच, नॅशनल करिअर सर्व्हिस सेंटर (मुंबई) यांच्यामार्फत निःशुल्क करिअर मार्गदर्शन, व्यावसायिक पुनर्वसन व एनसीएस (NCS) नोंदणीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील नोकरीस इच्छुक असलेल्या सर्व दिव्यांग उमेदवारांनी (एस.एस.सी. / एच.एस.सी. / पदवीधर – बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. आदी) www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी आणि आपल्या पात्रतेनुसार उद्योजकांकडे अर्ज करावेत. मेळाव्याच्या ठिकाणी येताना उमेदवारांनी आपली सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे, दिव्यांग प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट आकाराचे फोटो आणि बायोडाटा या सर्वांच्या प्रत्येकी तीन प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. माहितीसाठी कार्यालयाच्या ०२४१–२९९५७३५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, रोजगार मेळावा समन्वयक विजय सातव (९९७५१६४६९३), वसीमखान पठाण (९४०९५५५४६५), रुपेश कोकाटे (९१४६६०४७२०), बाजीराव सानप (९०११९३१०७४) आणि योगेश झांजे (९५८८४०८८९०) यांच्याशी संपर्क साधता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

# डिजिटल क्रांतीचे युग आले तरी वाचन संस्कृती थांबणार नाही

## सौ. शालिनीताई विखे पा. यांचे प्रतिपादन

नगर – साहित्य नगरी ग्रंथांना आपण गुरुची उपमा देतो. गुरु जसा आपल्या शिष्याला ज्ञानाने समृद्ध करतो. त्याचप्रमाणे ग्रंथ सुद्धा आपल्या वाचकांना ज्ञानाने समृद्ध करीत असतो. काळ कितीही बदलला डिजिटल क्रांतीचे युग आले तरी वाचन संस्कृती थांबणार नाही. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मा. अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पा. यांनी केले.


जिल्हा ग्रंथालय कार्यालय आयोजित प्रथम क्रमांक मिळालेल्या अक्षदा मैड हिला पारितोषिक वितरण करताना सौ.शालिनीताई विखे पा., कुलगुरू डॉ. विष्णु मगरे, श्रीमती कल्पना मैड, अशोक गाडेकर आदी

जिल्हा ग्रंथालय, सिंधुताई विखे पा. सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ उत्सव २०२५ रोजी लोणी बु. ता. राहता जि. अहिल्यानगर येथे बाळासाहेब विखे पा.सभागृहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी ग्रंथालयाच्या वतीने घेण्यात येणारे निबंध स्पर्धा ग्रंथवाचक वाचनालय चालक यांचा यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान सौ. शालिनीताई विखे पा. यांनी भुषवले. यावेळी श्रीमती कल्पना मैड (सरपंच, लोणी बुद्रुक), सुरेश पाटील (जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर), अशोक गाडेकर (जिल्हा ग्रंथालय अधिकारी), चंद्रकांत पालवे (साहित्यिक), डॉ. विष्णू मगरे (कुलगुरू प्रवरा मेडिकल ट्रस्ट), जयंत येऊलकर (म.सा.प. जिल्हाप्रमुख), गणेश भगत, रामदास शिंदे आदी उपस्थित होते.

विखे म्हणाल्या की, आपल्या अहिल्यानगर जिल्ह्याला साहित्याची मोठी परंपरा आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाचे निर्माण याच भूमीत केले आहे. त्यामुळे आध्यात्मिक ग्रंथाचे केंद्र म्हणून आपल्या जिल्ह्याची ओळख झाली आहे. बदलत्या जीवनचक्रामुळे डिजिटल वाचकांची संख्या वाढत आहे. त्यासाठी जिल्हा परिषद, माध्यमिक, महाविद्यालयात, वाचकांची वाढ होण्यासाठी डिजिटल साहित्य उपलब्ध करून देण्याकडे भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांनी वाचनासाठी दिवसातून एक तास द्यावा. आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला आहे. त्यासाठी मराठी भाषेची चळवळ उभी करून तरुण पिढीतून वाचक निर्माण झाले पाहिजेत. त्यातून मोठा वाचक वर्ग निर्माण केला पाहिजे. त्यासाठी वाचन संस्कृती रुजवण्यासाठी प्रत्येक गावात वाचनालय व विविध पुस्तके देण्यात येतील. ग्रंथ हातात घेऊन जो वाचण्यात आनंद आहे. तो कशामध्येच नाही. त्यासाठी शालेय जीवनातच वाचनाची आवड निर्माण करावी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक गाडेकर यांनी केले. सचिन जोपुळे यांनी आभार मानले.

अहिल्यानगर येथील जिल्हा ग्रंथालय कार्यालय सध्याभाडेतत्त्वावर आहे. आ. संग्राम जगताप यांच्या सहकार्यातून लवकरच ग्रंथालयाचे नवीन वास्तूत स्थलांतर होत आहे. याचा मनस्वी आनंद होत असल्याचे अशोक गाडेकर म्हणाले.

नाशिक मध्ये एका महिलेने आपल्या चहाच्या टपरीवर चहा घेण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांसाठी वाचनालय उभारून त्यामध्ये पुस्तके व वर्तमानपत्रे ठेवलि आहेत. यातून वाचक टपरीवर जाऊन व्यवसायासह त्यातून मोठा वाचक वर्ग निर्माण केला आहे. त्यांना पुरस्कार सुद्धा देण्यात आला. त्यासाठी त्यांचे अनुकरण करून आपल्याकडील हॉटेल्स व व्यवसायाच्या ठिकाणी वर्तमानपत्रे तसेच काही पुस्तके ठेवून वाचक तयार केले पाहिजे, असे सौ. शालिनीताई विखे पा. म्हणाल्या.


वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर यांच्या वतीने स्टाफ नर्सेससाठी 'इमरजन्सी नर्सिंग केअर, बेसिक लाईफ सपोर्ट (बीएलएस) व इन्फेक्शन कंट्रोल पॅक्टिस' या विषयावर सतत परिचर्या शिक्षण या कार्यक्रमाचे उद्घाटन जैन सोशल फेडरेशनचे विश्वस्त निखील लोढा यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

# 'वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग'मध्ये 'सतत परिचर्या शिक्षण कार्यक्रम' यशस्वी

नगर – कल्याणरोड येथे वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर यांच्या वतीने आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नोंदणीकृत स्टाफ नर्सेससाठी 'इमरजन्सी नर्सिंग केअर, बेसिक लाईफ सपोर्ट (बीएलएस) व इन्फेक्शन कंट्रोल पॅक्टिस' या विषयावर सतत परिचर्या शिक्षण या कार्यक्रमाचे उद्घाटन जैन सोशल फेडरेशनचे विश्वस्त निखील लोढा यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत कॅम्पस डायरेक्टर सुनील मालू, डॉ. विनोद खर्डे, जिल्हा रुग्णालयाचे संदीप काळे, कु. एंजेल सलावे व सौ.एस्थर तेलधुने यांनी वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या वतीने निरीक्षक म्हणून श्रीमती सलोमी तेलधुने आदी उपस्थित होते.

डॉ.विनोद खर्डे म्हणाले, एखादा अपघात झाला अथवा सार्वजनिक ठिकाणी रुग्णाचे हृदय अचानक बंद पडले. तर अशा आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला वैद्यकीय मदत उपलब्ध होईपर्यंत प्राथमिक उपचार मिळणे आवश्यक आहे. यासाठी नर्सेसची भूमिका महत्त्वाची ठरते. यावेळी दोन्ही हाताने रुग्णांच्या छातीच्या मध्यभागी दोन मिनिटे हृदयाला दाब देणे आवश्यक आहे. यामुळे रुग्णाचा धोका टाळला जाऊ शकतो.हे प्रात्यक्षिके द्वारे दाखवून दिले.

संदीप काळे म्हणाले, कोड ब्लू मध्ये नर्सिंग ची भूमिका महत्त्वाची आहे. कोड ब्ल्यू हा शब्द रुग्णालय व आरोग्यसेवा संस्थांमध्ये आपत्कालीन परिस्थितीमध्ये संकेत देण्यासाठी वापरला जातो. अशा परिस्थितीत रुग्णाचे हृदय धडकणे थांबलेले असते. तो किंवा ती बेशुद्ध अवस्थेत पडलेले असते. प्रतिसाद देत नाही. तात्काळ पुनर्जीवन उपचारांची आवश्यकता असते. अशा वेळी डॉक्टर्स, नर्स, श्वसनतज्ञ यांचा समावेश असलेली आरोग्यसेवा तज्ञांची एक विशेष टीम ज्याला पुन्हा जीवन पथक असे म्हणतात. रुग्णाला एकत्र येऊन तातडीने जीवन रक्षक उपचार सुरू करते.

प्रास्ताविकात कॅम्पस डायरेक्टर सुनील मालू म्हणाले, सदर कार्यक्रमास महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची मान्यता असून सहभागी परिचारिकांना १० क्रेडिट पॉइंट्स प्रदान करण्यात येणार आहेत. हा उपक्रम परिचारिकांच्या कौशल्यवृद्धी व व्यावसायिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. वैद्यकीय क्षेत्रात होणारे बदल लक्षात घेऊन नवीन तंत्रज्ञान अवगत करणेसाठी सतत परीचर्या शिक्षण कार्यक्रम महत्वाचा आहे. या कार्यक्रमात परिचारीकांनी सहभाग नोंदविला आहे. सध्या आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग अंतर्गत २ वर्षांचा ए.एन.एम.व ३ वर्षांचा जी.एन.एम.कोर्स उपलब्ध आहे. याशिवाय वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग अंतर्गत बीएससी नर्सिंग कोर्स चालू आहे.

या कार्यक्रमास अहिल्यानगर जिल्ह्यासह बीड, संभाजीनगर, पुणे, सोलापूर, नाशिक या जिल्ह्यातील ३०० परीचारीका उपस्थित होते. यावेळी प्राचार्या डॉ. विद्या ठोकळ यांनी आभार मानले.

# नक्षत्र मोबाईल अ‍ॅक्सेसरीज आणि रिपेअरिंगचे उद्घाटन

नगर – वाडिया पार्क येथील 'नक्षत्र मोबाईल अ‍ॅक्सेसरीज आणि रिपेअरिंग' या दालनचे उद्घाटन आयुर्वेदिक गुणे कॉलेजचे सचिन जगताप यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या कार्यक्रमास सौ. पूजा पंकज तिजोरे, माणिकराव विधाते, तसेच संचालक निखिल सिन्नरकर व प्रकाश सिन्नरकर, तिजोरे परिवार आदी उपस्थित होते.


'नक्षत्र मोबाईल अ‍ॅक्सेसरीज आणि रिपेअरिंग' या दालनाचे उद्घाटन सचिन जगताप यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

या दालनात मोबाईलसाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या अ‍ॅक्सेसरीज उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यामध्ये मोबाईल कव्हर्स, टेम्पर्ड ग्लास, इअरफोन्स, चार्जर्स, डेटा केबल्स, ब्लूटूथ स्पीकर्स, पॉवर बँक, मोबाईल स्टँड आदी वस्तू वाजवी दरात उपलब्ध आहेत. तसेच सर्व प्रकारच्या स्मार्टफोनची दुरुस्ती येथे अत्याधुनिक साधनसामग्रीच्या साहाय्याने तज्ज्ञांकडून केली जाणार आहे. स्क्रीन बदलणे, बॅटरी बदलणे, सॉफ्टवेअर अपडेट, लॉक/अनलॉक सेवा, वॉटर डॅमेज रिपेअर, स्पीकर व मायक्रोफोन दुरुस्ती, मदरबोर्ड रिपेअर अशा विविध सेवा विश्वासार्ह आणि जलदगतीने दिल्या जाणार असल्याची माहिती संचालकांनी दिली. ग्राहकांना दर्जेदार सेवा आणि पारदर्शक व्यवहार देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. ग्राहकांचे समाधान हाच आमचा मुख्य उद्देश असून, कमी वेळेत उत्कृष्ट सेवा देण्याचा आम्ही प्रयत्न करू, असे प्रतिपादन निखिल सिन्नरकर यांनी केले.




## जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा भेट

नगरमधील जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजातील गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा, अन्नधान्य दिले जाते. यावेळी कांतीलाल नवलमल गुंदेचा, शुभम महेश गुंदेचा, तनिष्का महेश गुंदेचा, बाबुशेठ बोरा, वात्सल्य संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, ईश्वर बोरा, मुलचंद डागा, सचिन कोठारी, सेक्रेटरी विजय गुगळे आदी उपस्थित होते.

# मधुसूदन सारडा व करीमभाई हुंडेकरी यांनी चिकाटी, दूरदृष्टी आणि विश्वासार्ह सेवाभावी वृत्ती जोपासल्याने कंपनीची प्रगती

## नरेशकुमार गवई यांचे गौरवपूर्ण उद्गार; अल्ट्राटेक कंपनी तर्फे विशेष सत्कार

नगर – ३५ वर्षांपूर्वी अहिल्यानगर परिसरात कंपनीची विक्री मर्यादित प्रमाणात होती. त्याकाळात उद्योजक मधुसूदन सारडा व करीमभाई हुंडेकरी यांनी चिकाटी, दूरदृष्टी आणि विश्वासार्ह सेवाभाव यांच्या बळावर कामाची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या अथक परिश्रमातून १२० डीलर्स व ८०० हून अधिक रिटेलर्सचे मजबूत जाळे उभे राहिले आहे. कंपनीच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिल्याबद्दल त्यांना कंपनीचे दोन स्ट्रॉंग खांब असा गौरवपूर्ण उल्लेख कंपनीचे अहिल्यानगर भागाचे मुख्य अधिकारी नरेशकुमार गवई यांनी केला.

आदित्य बिर्ला समूहाची भारतामधील सर्वात मोठी सिमेंट उत्पादक कंपनी आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाची कंपनी असलेल्या अल्ट्राटेक कंपनी सोबत गेल्या तब्बल ३५ वर्षांपासून निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्यरत असलेले मे. बी.झेड.सारडा फर्मचे उद्योजक मधुसूदन सारडा तसेच हुंडेकरी ट्रान्सपोर्टचे करीमभाई यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कंपनीचे नगर जिल्हा मार्केटिंग चे मुख्य नरेशकुमार गवई, पुणे विभागाचे लॉजिस्टिकचे मुख्य निखिल सिंग, तसेच मनोज पाटील, विरेंद्र साबळे, शुचित गुप्ता, पराग जोशी, रामप्रसाद मुथा, स्मिता सारडा आदींसह कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.


मे. बी.झेड.सारडा फर्मचे उद्योजक मधुसूदन सारडा तसेच हुंडेकरी ट्रान्सपोर्टचे करीमभाई यांचा अल्ट्राटेक कंपनीतर्फे सत्कार करण्यात आला.

कंपनीची महिन्याची विक्री विक्रमी टनांपर्यंत पोहोचली. ही कामगिरी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सहकार्य आणि योग्य नियोजन यांच्या पाठबळामुळेच शक्य झाली, अशी कृतज्ञ भावना मधूसुदन सारडा यांनी व्यक्त केली.

शहरातील हुंडेकरी लॉन्स येथे अल्ट्राटेक कंपनीच्या सुमारे १५०० डीलर्स व रिटेलर्स यांचा स्नेह मेळावा झाला.

उद्योजक करीमभाई यांनी सर्वांना आवाहन केले की, आगामी काळात सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून दरमहा १ लाख मेट्रिक टन विक्रीचा टप्पा गाठण्याचा संकल्प करूया. कंपनीचे उच्च दर्जाचे सिमेंट धरणे, महामार्ग, मोठे पायाभूत प्रकल्प, नामांकित बांधकाम व्यावसायिक तसेच घरांच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. ओपीसी, पीपीसी तसेच इतर विविध सिमेंट प्रकारांद्वारे गुणवत्ता व विश्वास यांचे अधिष्ठान कायम राखले आहे. हा सन्मान त्यांच्या ३५ वर्षांच्या निर्दोष, समर्पित आणि प्रेरणादायी सेवेला दिलेली योग्यदान आहे.



महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज् असोसिएशन (मेस्टा) यांच्या वतीने आयोजित आंतरशालेय नृत्य स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळा पार पडला.

# स्पर्धांमुळे आत्मविश्वास वाढून भविष्यात यश संपादन करण्यासाठीची प्रेरणा मिळते

## महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन, महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज् असोसिएशन आयोजित आंतरशालेय नृत्य स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळा

नगर – विद्यार्थी जीवनात अशा स्पर्धा अत्यंत गरजेच्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढीस लागतो आणि भविष्यात यश संपादन करण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी केले.

महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज् असोसिएशन (मेस्टा) यांच्या वतीने आयोजित आंतरशालेय नृत्य स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळा पार पडला.

कार्यक्रमास महापौर सौ.ज्योतीताई गाडे, नगरसेवक संपत बारस्कर, मीराज स्कूलच्या प्राचार्या सौ. मीरा बारस्कर, राऊ इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सौ. दिपाली झांजड, लिटील फ्लावर स्कूलचे गोरक्षनाथ नरवडे, माऊली इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सौ. सविता वाव्हळ, ब्लू डायमंड स्कूलचे सुजित डोंगरे, साई इंग्लिश मिडीयम स्कूलचे आदर्श ढोरजकर, डॉ. शरद कोलते. इंग्लिश मिडीयम स्कूलचे प्रा. विजय शिंदे यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नगरसेवक संपत बारस्कर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. वैष्णवी उदमले आणि सृष्टी मगर यांनी सादर केलेल्या गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरेख नांदी झाली. या स्पर्धेत सात शाळांमधील एकूण ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

नगरसेवक संपत बारस्कर यांनीही मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

स्पर्धेतील निकालात माऊली इंग्लिश मिडीयम स्कूलने प्रथम क्रमांक पटकावला, तर ब्लू डायमंड अॅकॅडेमीने द्वितीय क्रमांक मिळवला. मीराज स्कूलला उत्तेजनार्थ तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांना महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी जादुगार धनंजय जाधव यांचा जादूचा आकर्षक प्रयोग सादर करण्यात आला. नृत्य स्पर्धेचे परीक्षक म्हणून सिद्धार्थ मेहेत्रे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे नियोजन बोल्हेगाव येथील मीराज स्कूलच्या प्राचार्या सौ. मीरा बारस्कर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विजय शिंदे यांनी केले. सुजित डोंगरे यांनी आभार मानले. संघटनेच्या वतीने वर्षभर विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला.

# वनराई व्हिलेज रिसॉर्टमध्ये ३ मार्चला 'रंग बरसे होली पूल पार्टी'चे आयोजन




नगर – होळीच्या रंगीबेरंगी उत्सवासाठी ३ मार्च रोजी वनराई व्हिलेज रिसॉर्ट मध्ये रंग बरसे होली पूल पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता पारंपरिक होळी पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर डीजेच्या ठेक्यावर रंगांची उधळण आणि रेन डान्सचा जल्लोष रंगणार आहे. सहभागींसाठी नैसर्गिक व त्वचेला सुरक्षित रंगांची व्यवस्था करण्यात आली असून, लाईव्ह म्युझिक, फूड स्टॉल्स, सेल्फी पॉइंट आणि विविध मनोरंजन उपक्रमांचा आनंद घेता येणार आहे.

कार्यक्रमस्थळी सुरक्षा व्यवस्थेकडे विशेष लक्ष दिले गेले आहे. लाइफगार्ड, वैद्यकीय पथक तसेच महिलांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध असतील, अशी माहिती संचालक दिग्विजय म्हस्के आणि प्रताप म्हस्के यांनी दिली.

कार्यक्रमाचे ठिकाण व अधिक माहितीसाठी संपर्क वनराई व्हिलेज रिसॉर्ट, एमआयडीसी शेंडी बायपास, दत्त मंदिर जवळ, वडगाव गुप्ता, अहिल्यानगर ९७३०००१५७९



## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या भिंगार शहराध्यक्ष पदावर विकास चव्हाण यांची नियुक्ती

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या भिंगार शहराध्यक्ष पदावर विकास चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली. त्यावेळी अहिल्यानगर मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, महिला जिल्हाध्यक्षा अॅड.अनिता दिघे, अहिल्यानगर शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, मनविसेचे राज्य उपाध्यक्ष सुमीत वर्मा, अहिल्यानगर शहर सचिव डॉ. संतोष साळवे, सहकार सेनेचे शहराध्यक्ष गणेश शिंदे, अहिल्यानगर उपशहराध्यक्ष तुषार हिरवे, दिपक दांगट, गणेश वाघस्कर, श्यामसुंदर साळवे उपस्थित होते.

# 'लक्ष्मीबाई भाऊराव' विद्यालयाच्या स्नेहसंमेलनात 'नारीशक्ती'चा जागर; पर्यावरण व पाणी प्रश्नावर प्रभावी संदेश

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून स्त्री शक्तीचे दर्शन घडविले. पर्यावरण व पाणी प्रश्नावर गीत व नाटिकेद्वारे जागृती केली. गरबा नृत्य, आदिवासी नृत्य आणि महाराष्ट्रासह दक्षिण भारतातील पारंपारिक गीतांवर नृत्याचे सादरीकरण करुन उपस्थितांची मने जिंकली. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्‌टन कर्मवीर भाऊराव व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. विक्रम वाडेकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, स्कूल कमिटी सदस्य अंबादास गारुडकर, सल्लागार समिती सदस्य माजी प्राचार्य शिवाजीराव भोर, विष्णुपंत म्हस्के, शामराव व्यवहारे, विश्वासराव काळे, माजी सहसचिव तथा जनरल बॉडी सदस्य डॉ. के.एच. शिंदे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

### सांस्कृतिक कार्यक्रमातून 'नारीशक्ती'चा जागर; पर्यावरण व पाणी प्रश्नावर प्रभावी संदेश



रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन कर्मवीर भाऊराव व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करुन करताना रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे आदी.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका छायाताई काकडे यांनी शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. याशिवाय कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना चालना देण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्वागत ज्येष्ठ शिक्षक महादेव भद्रे यांनी केले.

अॅड. विक्रम वाडेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मोबाईल हे मारक ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुण बहरण्यासाठी त्यांना मोबाईलपासून परावृत्त करावे लागणार आहे. मोबाईलचा उपयोग फक्त ज्ञान आत्मसात व शिक्षणासाठी होण्याची गरज आहे. मात्र विद्यार्थी फक्त रिल्स स्क्रोलींग करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अर्जुन पोकळे म्हणाले, सक्षम विद्यार्थी घडण्यासाठी ज्ञानाबरोबरच व्यायाम महत्त्वाचा आहे. विविध क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी सदृढ शरीर देखील महत्त्वाचा आहे. रयत शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास साधला जात आहे. तसेच सर्वसामान्य वर्गाला शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन, शाळेत सर्वधर्म समभाव या मुल्यांची रुजवण केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले, विद्यार्थ्यांचे कलागुण ओळखून त्या दिशेने पालकांनी प्रोत्साहन द्यावे. शिक्षक–पालकांनी विद्यार्थ्यांचे कलागुण ओळखणे, हे आजच्या काळाची गरज निर्माण झाली असल्याचे सांगितले. देवा श्री गणेशा या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आम्ही गड डोंगरच राहणार..., तांडव नृत्य..., महाभारत गीत नृत्य... गणपती आरती या गीतांवर युवक–युवतींनी बेभानपणे नृत्य सादर केले. पाणी हरवलं या भारुड गीताद्वारे पाणी चे महत्व पटवून देण्यात आले. कोळीवाड्याची शान, साउथ इंडियन डान्सद्वारे विविध संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले.

नारी शक्ती नृत्यद्वारे स्त्रीशक्तीचा जागर करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्रावर नाटिका व गीत सादर करण्यात आले. सख्खी बायको गेली... या भारुड गीताने सभागृहात हास्य फुलले होते. ऑपरेशन सिंदूर ने भारतीय सैन्य जवानांची शक्ती प्रदर्शित करून देशभक्ती जागृती करण्यात आली. यामध्येवस्तीगृहातील मुलींनी देखील विविध कलागुणांचे सादरीकरण केले.

सूत्रसंचालन स्मिता पिसाळ व प्रदीप पालवे यांनी केले. स्वाती गारुडकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनीता लांडगे, मंगेश कारखिले, उमेश विलायते, राजेंद्र देवकर, सुषमा गंभीरे, सुवर्णा सानप, ज्योती उबाळे, जिजामाता कन्या वस्तीगृह अधीक्षक ज्योती मोकळ, अमृता थोरात, सुप्रिया निमसे या शिक्षक, शिक्षकेतरांचे सहकार्य लाभले.

# राष्ट्रीय कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राला उपविजेतेपद

### दिशान गांधीच्या मार्गदर्शनाखाली मोठे यश : डॉ.प्रकाश कांकरिया यांचे प्रतिपादन

नगर – पंजाब राज्यातील लव्हली युनिर्व्हसिटी, जालंधर येथे झालेल्या राष्ट्रीय कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने उपविजेतेपद मिळवत रजत पदक पटकावले आहे. आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान गांधी याच्या मार्गदर्शनात नवखे खेळाडू असतानाही महाराष्ट्राने मिळवलेले यश हे कौतुकास्पद असून नगरची कॉर्फबॉलमधील सातत्यपूर्ण निरंतर कामगिरी आनंददायी आहे, असे कॉर्फबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ.प्रकाश कांकरिया यांनी सांगितले.



कॉर्फबॉल खेळाडूंचा सत्कार करतानाच मानकन्हैया ट्रस्टच्या वतीने असोसिएशनचे विश्वस्त, क्रीडा प्रशिक्षक प्रा.संजय धोपावकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

संघाच्या यशात दिशानचा प्रमुख व सिंहाचा वाटा असून साजरी परदेशी व भक्ती परदेशी या नगरच्या खेळाडूंनीही चांगली कामगिरी केल्याने त्यांचा असोसिएशनतर्फे सत्कार करण्यात आला. फेडरेशन कप २०२६ नामक या स्पर्धेत महाराष्ट्राने प्रथम तामिळनाडूचा १३–३, दिल्लीचा १४–६ असा पराभव केला. यानंतर उपांत्य सामन्यात हरियाणाचा १३–७ असा पराभव केला. अंतिम सामना अटीतटीचा होवून त्यात महाराष्ट्रावर केवळ ३ गुणांनी ९–१२ अशी मात करीत हिमाचल प्रदेशने विजेतेपद पटकाविले.

यावेळी खेळाडूंचा सत्कार करतानाच मानकन्हैया ट्रस्टच्या वतीने असोसिएशनचे विश्वस्त, क्रीडा प्रशिक्षक प्रा.संजय धोपावकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

प्रा. संजय धोपावकर म्हणाले की, मी आणि किशोर गांधी यांनी सुरूवातीपासून कॉर्फबॉल सारख्या नवीन क्रीडा प्रकाराला चालना देत खेळाडूंना प्रोत्साहन दिले. आज नगरचे खेळाडू महाराष्ट्रात देशात चमकत आहेत तर दिशान गांधी याने आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करून दाखवली आहे. भविष्यात नगरचा संघ सुवर्ण कामगिरी करून या खेळातील नैपुण्य सिद्ध करतील असा विश्वास आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, महाराष्ट्र अध्यक्ष मानवतकर, प्रशिक्षक गौतम जाधव यांनी संघाचे अभिनंदन केले. राष्ट्रीय अध्यक्ष हिमांशु मिश्रा, सैनी सर, प्रमुख प्रशिक्षक देव सर आदींनी खेळाडूंचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विश्वस्त डॉ.प्रशांत सुरकुटला, डॉ.सुधा कांकरिया आदी उपस्थित होते. प्रास्ताविक असोसिएशनचे सचिव किशोर गांधी यांनी केले. स्तवन प्रभू यांनी आभार मानले.

# सावेडी येथील 'ज्ञानसंपदा शाळेत' माय मराठी व संस्कार कीर्तन सेवा

नगर – मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आणि कविवर्य कुसुमाग्रज जयंती निमित्त सावेडीतील उपक्रमशील शाळा ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी माय मराठी व संस्कार या विषयावर कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले. कीर्तनसेवेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अभिजात मराठी भाषेची रुजवात करणे, मराठी संत साहित्य, लोकसाहित्य व साहित्य संपदा याबाबत माहिती मिळवणे तसेच माय मराठीचे संवर्धन करणे असा होता.



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आणि कविवर्य कुसुमाग्रज जयंती निमित्त सावेडीतील उपक्रमशील शाळा ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी माय मराठी व संस्कार या विषयावर कीर्तन सेवा बाल कीर्तनकार हरिभक्त परायण कु. रेणुकाताई निसळ यांच्या अमृतवाणीतून साकार झाली. (छाया – उदय जोशी)

कीर्तन सेवा बाल कीर्तनकार हरिभक्त परायण कु. रेणुकाताई निसळ यांच्या अमृतवाणीतून साकार झाली. ताईंनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे अभंग रसाळ वाणीतून सादर करत विद्यार्थ्यांना देव, देश आणि धर्म याबाबत कर्तृत्व सिद्ध करण्यास प्रेरित केले. तसेच मराठी भाषेचे महत्त्व, आई–वडिलांचे योगदान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य व पराक्रमाचा आदर्श आत्मसात करावा, असे सांगितले.

कीर्तनात हार्मोनियमची साथ कल्याण मुरकुटे आणि तबल्याची साथ हर्षद भावे यांनी दिली.

या कार्यक्रमास संस्थेचे खजिनदार अविनाश बापर्डीकर, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते.

स्वागत भाग्यश्री जाधव, प्रास्ताविक शिल्पा कुलकर्णी, तर कीर्तनकार ताईंचा परिचय कैलास जाधव यांनी दिला. कीर्तनसेवा विद्यार्थ्यांमध्ये संस्कार रुजवण्यास आणि मराठी भाषेचे महत्त्व समजावून सांगण्यास उपयुक्त ठरली.

# आठरे पाटील स्कूलमध्ये विज्ञान व गणित प्रदर्शन

नगर – सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेत २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सलग आठव्या वर्षी विज्ञान व गणित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे विश्वस्त मानसिंग आठरे पाटील व डॉ. अदिती आठरे पाटील उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते विज्ञान व गणित प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले.



आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान व गणित प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना मानसिंग आठरे पाटील.

प्रमुख अतिथी विश्वस्त मानसिंग आठरे पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की विद्यार्थ्यांच्या बौध्दिक व शारीरिक व्यक्तिमत्व विकासासाठी शाळेत अनेक सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजावा, सुप्त कलागुणांना वाव, तसेच त्यांच्यामध्ये असलेला न्यूनगंड दूर होऊन जिद्द, चिकाटी, परिश्रम, शिस्त, स्वच्छता, नेतृत्व, संवाद कौशलय, ऐक्य, समानता व आत्मविश्वास हे गुण त्यांच्यात आत्मसात होण्यासाठी शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यामागचा उद्देश आहे.

शाळेच्या परिपाठाच्या वेळेस विज्ञान दिनानिमित्त प्राथमिक विभागाच्या चिमुकलयांनी स्वच्छतेचे वीज वाचवा, निसर्ग संवर्धन व सप्तरंगाची निर्मिती यावर छोटीशी नाटिका सादर करुन उपस्थित विद्यार्थ्याना अनमोल असा संदेश दिला.

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने शाळेच्या सभागृहात पूर्व प्राथमिक व प्राथमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे गणित व विज्ञान या विषयावर नवीन नवीन उत्कृष्ट अशा प्रतिकृती तयार करुन त्या विषयीची माहिती दिली. गणित या विषयाच्या प्रतिकृतीमध्ये इयत्ता पहिलीत उंडाळे स्वानंद, इयत्ता दुसरीत पवार केशव, इयत्ता तिसरीत खैरे भार्गवी आणि इयत्ता चौथीत रजपूत अमृता यांनी अनुक्रमे प्रथम क्रमांक पटकावला. तर विज्ञान या विषयाच्या प्रतिकृतीमध्ये इयत्ता पहिलीत घुले प्राप्ती, इयत्ता दुसरीत एकशिंगे श्रावी, इयत्ता तिसरीत लाखे शिवम आणि इयत्ता चौथीत दहातोंडे आरध्या यांनी अनुक्रमे प्रथम क्रमांक पटकावला.

या विज्ञान व गणित प्रदर्शनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्टच्या सन्माननीय अध्यक्षा डॉ. सौ. अंजली आठरे पाटील व कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, तसेच सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, समन्वयक, पर्यवेक्षिका सर्व शिक्षकवृंद–शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी कौतुक केले.

# थायलंड येथील आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत नगरच्या पैं.प्रियज करपे याला रौप्य पदक

### १ लाख रुपयांच्या बक्षीसाची घोषणा

नगर – थायलंड येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत मेहेकरी (ता. नगर) येथील कुस्तीपटू पैलवान प्रियज संतोष करपे याने रौप्य पदक पटकाविले. या यशाबद्दल अॅड. गुणरत्न सदावर्ते यांनी पैलवान करपे याचा सत्कार केला.



पैलवान करपे हा मेहेकरी येथील क्रीडा लक्ष्य तालिममध्ये वस्ताद तात्या करपे यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचा सराव करत आहे.

अॅड. गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, प्रियज करपे याने परिस्थितीवर मात करुन कुस्ती क्षेत्रात केलेली कामगिरी प्रेरणादायी आहे. हलाखीच्या परिस्थितीतूनही जिद्द, सातत्य आणि प्रामाणिक मेहनत यांच्या जोरावर आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचता येते, हे प्रियजने सिद्ध करून दाखवले आहे. आजच्या युवकांनी मोबाईल आणि आभासी दुनियेपासून दूर राहून क्रीडा, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात स्वतःला झोकून द्यावे.

ते पुढे म्हणाले, खेळाडूंना योग्य वेळी प्रोत्साहन मिळाले, तर त्यांची उर्जा दुणावते. समाजातील सक्षम घटकांनी अशा खेळाडूंना आर्थिक व नैतिक आधार देणे ही आपली जबाबदारी आहे. प्रियजसारख्या तरुणांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. या यशाचा गौरव करत अॅड. सदावर्ते यांनी त्याला १ लाख रुपये बक्षीस देण्याचे जाहीर आश्वासन दिले.

प्रियज करपे यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, माझ्या कुटुंबियांचे, प्रशिक्षकांचे आणि मला साथ देणाऱ्या सर्वांचे हे यश आहे. देशासाठी सुवर्णपदक मिळवण्याचा माझा पुढील संकल्प असल्याचे स्पष्ट केले.



आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत मेहेकरी (ता. नगर) येथील कुस्तीपटू पैलवान प्रियज संतोष करपे याने रौप्य पदक पटकाविले. या यशाबद्दल अॅड. गुणरत्न सदावर्ते यांनी पैलवान करपे याचा सत्कार केला.

# अर्थजगत

विमा क्षेत्रातील बदलत्या नियमांनुसार आता केवळ वय आणि उत्पन्नच नव्हे, तर तुमची शैक्षणिक पात्रता देखील टर्म इन्शुरन्सच्या प्रीमियमवर आणि तो मिळणार की नाही यावर मोठा प्रभाव टाकत आहे. भारतीय विमा बाजारपेठेत पदवीधर आणि बिगर-पदवीधर अशा दोन श्रेणींमध्ये विमा कंपन्यांनी स्पष्ट विभागणी केली असून, यामुळे मिळणाऱ्या विम्याच्या रकमेत आणि द्याव्या लागणाऱ्या प्रीमियममध्ये मोठी तफावत दिसून येते.

## शैक्षणिक पात्रता आणि टर्म इन्शुरन्सचा हप्ता

विमा कंपन्यांच्या दृष्टिकोनातून पदवीधर असणे हे केवळ शैक्षणिक यश नसून ते आर्थिक स्थिरता आणि जबाबदार जीवनशैलीचे निदर्शक मानले जाते. आकडेवारीनुसार, जे लोक किमान पदवीधर आहेत, त्यांना विमा कंपन्या 'कमी जोखमीचे' ग्राहक मानतात. याचे मुख्य कारण म्हणजे पदवीधर व्यक्तींना सहसा कॉर्पोरेट किंवा संघटित क्षेत्रात नोकरी मिळते, जिथे कामाचे स्वरूप शारीरिकदृष्ट्या कमी जोखमीचे असते. याउलट, बिगर-पदवीधर व्यक्ती अनेकदा असंघटित क्षेत्रात किंवा अशा कामांमध्ये गुंतलेल्या असतात जिथे अपघाताची किंवा आरोग्याच्या समस्यांची शक्यता तुलनेने जास्त असते. यामुळेच अनेक नामवंत विमा कंपन्या पदवीधरांना प्रीमियममध्ये ५ ते १० टक्क्यांपर्यंत सवलत देतात किंवा त्यांना कमी दरात उच्च विमा संरक्षण उपलब्ध करून देतात.

### विविध कंपन्यांचे निकष आणि अटी

भारतातील अग्रगण्य विमा कंपन्या जसे की एचडीएफसी लाईफ , आयसीआयसीआय प्रुडेन्शियल आणि मॅक्स लाईफ यांच्या नियमावलीत शिक्षणाला विशेष स्थान आहे. अनेक कंपन्यांच्या 'प्युअर टर्म प्लॅन्स'मध्ये १ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचा विमा हवा असेल, तर अर्जदार किमान पदवीधर असणे अनिवार्य असते. जर एखादी व्यक्ती पदवीधर नसेल, तर तिला ठराविक मर्यादेपेक्षा (उदा. २५ ते ५० लाख) जास्त रकमेचा विमा नाकारला जाऊ शकतो किंवा त्यासाठी अतिरिक्त प्रीमियम आकारला जातो. टाटा एआयएसारख्या



कंपन्यांमध्ये तर शैक्षणिक पात्रतेनुसार ग्राहकांचे 'अंडररायटिंग'केले जाते, ज्यामध्ये पदवीधरांना प्रिफर्ड श्रेणीत ठेवून स्वस्त प्रीमियमचे पर्याय दिले जातात.

### बिगर-पदवीधरांसाठी प्रीमियम जास्त असण्याची कारणे

विमा कंपन्या 'लॉ ऑफ लार्ज नंबर्स' आणि 'डेटा ॲनालिटिक्स'वर आधारित काम करतात. त्यांच्याकडे असलेल्या माहितीनुसार, उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांमध्ये आरोग्याप्रती जागरूकता जास्त असते आणि ते नियमित वैद्यकीय तपासणी करण्याकडे कल ठेवतात. बिगर-पदवीधरांच्या बाबतीत, विमा कंपन्यांना 'मॉर्टेलिटी रिस्क' जास्त वाटते. शिक्षणाअभावी अनेकदा रोजगाराच्या संधी मर्यादित असतात, ज्यामुळे उत्पन्नाची शाश्वती कमी असू शकते. उत्पन्नातील चढ-उतारामुळे पॉलिसी लॅप्स होण्याचे प्रमाण बिगर-पदवीधरांमध्ये जास्त आढळते. तसेच, व्यावसायिक धोके आणि राहणीमानाचा दर्जा या घटकांमुळे त्यांच्या आयुर्मानावर परिणाम होऊ शकतो, असे विमा कंपन्यांचे गणित सांगते. म्हणूनच, जोखमीची भरपाई करण्यासाठी या श्रेणीतील ग्राहकांकडून अधिक प्रीमियम वसूल केला जातो. टर्म इन्शुरन्स घेताना केवळ कमी प्रीमियमकडे न पाहता, आपल्या शैक्षणिक पात्रतेचे योग्य पुरावे सादर करणे आवश्यक आहे. जर तुम्ही पदवीधर असाल, तर विम्याच्या अर्जासोबत तुमची पदवी प्रमाणपत्रे नक्की जोडा, जेणेकरून तुम्हाला 'प्रिफर्ड रेट्स'चा लाभ मिळू शकेल.

दुसरीकडे, बिगर-पदवीधरांसाठी आता सरल जीवन विमासारखे पर्याय उपलब्ध आहेत, जे विशेषतः कमी उत्पन्न आणि कमी शैक्षणिक पात्रता असलेल्या लोकांसाठी तयार करण्यात आले आहेत. मात्र, तिथे विम्याची रक्कम मर्यादित असते. भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेसाठी शिक्षण ही केवळ नोकरीसाठीची अट नसून ती तुमच्या कुटुंबाला स्वस्त दरात मोठे विमा कवच मिळवून देणारी गुरुकिल्ली ठरत आहे.

विमा हप्त्यातील तफावत आणि शैक्षणिक पात्रतेचा प्रभाव समजून घेण्यासाठी विविध कंपन्यांच्या नियमांचा सविस्तर आढावा घेणे आवश्यक आहे.

एक कोटी रुपयांच्या टर्म इन्शुरन्ससाठी एचडीएफसी लाईफसारख्या नामांकित कंपनीमध्ये ३० वर्षे वयोगटातील पदवीधर व्यक्तीला साधारणपणे ९,५०० ते १०,५०० रुपयांच्या दरम्यान वार्षिक प्रीमियम पडतो, तर याच वयोगटातील बिगर-पदवीधर व्यक्तीसाठी हाच हप्ता १२,००० ते १३,५०० रुपयांपर्यंत जातो. याचे मुख्य कारण म्हणजे या कंपनीत बिगर-पदवीधरांसाठी विमा संरक्षणाची मर्यादा अनेकदा कमी ठेवली जाते.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल मध्ये देखील अशीच स्थिती पाहायला मिळते. तिथे पदवीधरांना 'प्रिफर्ड' म्हणजे पसंतीची श्रेणी दिली जाते, ज्यामुळे त्यांचा हप्ता ९,२०० ते १०,२०० रुपयांच्या आसपास असतो. याउलट, बिगर-पदवीधरांना ११,८०० ते १३,००० रुपये मोजावे लागतात. मॅक्स लाईफ कंपनीच्या नियमानुसार, जर तुम्हाला १ कोटी रुपयांचे विमा संरक्षण हवे असेल, तर पदवीधर असणे अनिवार्य आहे. तिथे पदवीधरांसाठी ८,८०० ते ९,८०० रुपयांचा हप्ता आकारला जातो, तर पदवी नसलेल्यांना ११,५०० ते १२,५०० रुपये द्यावे लागतात.

टाटा एआयए आणि बजाज अलायन्झ या कंपन्यांमध्ये शिक्षणासोबतच उत्पन्नाच्या पुराव्याला अत्यंत महत्त्व दिले जाते. टाटा एआयए मध्ये पदवीधरांचा हप्ता ९,७०० ते १०,७०० रुपये असून बिगर-पदवीधरांसाठी तो १२,५०० ते १४,००० रुपयांपर्यंत वाढतो. बजाज अलायन्झमध्ये पदवी नसलेल्या व्यक्तींना केवळ जास्त प्रीमियमच भरावा लागत नाही, तर त्यांच्या वैद्यकीय चाचण्यांचे (मेडिकल टेस्ट) निकषही अधिक कडक असतात. तेथे पदवीधरांना ९,४०० ते १०,४०० रुपयांत विमा मिळतो, तर इतरांना ११,७०० ते १३,२०० रुपये खर्च करावे लागतात.



## ईटीएफच्या नियमातील प्रस्तावित बदलांचा अन्वयार्थ

**सोने आणि चांदीमधील गुंतवणूकदारांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. बाजार नियामक संस्था 'सेबी', गोल्ड आणि सिल्वर ईटीएफच्या (एक्सचेंज ट्रेडेड फंड) नियमावलीत आमूलाग्र बदल करण्याच्या तयारीत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतींमधील प्रचंड चढ-उतार आणि भारतीय ईटीएफच्या किमती यातील तफावत दूर करण्यासाठी हे पाऊल उचलले जाणार आहे.**

### किमतींमधील तफावत रोखण्याचे आव्हान

आंतरराष्ट्रीय बाजारात सोने आणि चांदीचे व्यवहार २४ तास सुरू असतात. मात्र, भारतात हे व्यवहार केवळ ठराविक वेळेतच होतात. यामुळे अनेकदा ईटीएफची बाजारपेठेतील किंमत आणि त्यांची प्रत्यक्ष मालमत्ता मूल्य यांच्यात मोठी तफावत निर्माण होते. ही 'मिसप्राईसिंग'ची समस्या सोडवण्यासाठी सेबीने १४ फेब्रुवारी २०२६ रोजी एक कन्सल्टेशन पेपर प्रसिद्ध केले असून त्यावर जनतेकडून सूचना मागवल्या आहेत.

**स्थिर किंमत मर्यादा हटवणार?:** सध्या गोल्ड आणि सिल्वर ईटीएफवर दोन दिवसांपूर्वीच्या एनएव्हीवर आधारित अधिक किंवा उणे २० टक्क्यांचा 'फिक्स्ड प्राईस बँड' लागू आहे. मात्र, अलीकडच्या काळातील अस्थिरता पाहता ही व्यवस्था अपुरी ठरत आहे. सेबीने आता हा स्थिर बँड हटवून 'डायनॅमिक प्राईस बँड' लागू करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

नवीन प्रस्तावानुसार, प्राईस बँड आदल्या दिवसाच्या सूचक एनएव्हीवर आधारित असेल. सुरुवातीची मर्यादा ६ टक्के असेल, जी सत्रादरम्यान टप्प्याटप्प्याने जास्तीत जास्त औ२० टक्क्यांपर्यंत वाढवता येईल. प्रत्येक टप्प्यावर ३ टक्क्यांची सवलत (फ्लेक्स) दिली जाईल आणि बदलांनंतर १५ मिनिटांचा 'कुलिंग-ऑफ' कालावधी ठेवला जाईल. एका दिवसात जास्तीत जास्त दोनवेळाच असा बदल करता येईल.

**फेरबदलासाठी कडक अटी :** बाजारात कृत्रिमरीत्या किमती वाढवल्या जाऊ नयेत, यासाठी सेबीने कडक अटी घातल्या आहेत. प्राईस बँडमध्ये बदल करण्यापूर्वी त्या समभागात किमान ५० व्यवहार, १० वेगळे क्लाइंट कोड आणि तीन वेगवेगळ्या ट्रेडिंग सदस्यांचा सहभाग असणे अनिवार्य असेल. यामुळे बाजारातील बदल खऱ्या हालचालींवर आधारित आहेत की नाही, याची खात्री केली जाईल.

### 'प्री-ओपन सेशन'चा नवा पर्याय

जागतिक बाजारपेठेतील किमतींशी ताळमेळ बसवण्यासाठी सेबीने गोल्ड आणि सिल्वर ईटीएफसाठी स्वतंत्र 'प्री-ओपन सेशन' सुरू करण्याचा विचार मांडला आहे. यामुळे सकाळी बाजार उघडताच होणारी मोठी घसरण किंवा वाढ टाळता येईल आणि गुंतवणूकदारांना योग्य दरात व्यवहार करण्याची संधी मिळेल.

### गुंतवणूकदारांचा फायदा काय?

सध्याच्या पद्धतीत एक दिवसाचा विलंब (लॅग) असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात रातोरात होणाऱ्या बदलांचा फायदा भारतीय गुंतवणूकदारांना तातडीने मिळत नाही. नवीन 'ग्रेडेड आणि डायनॅमिक प्राईस बँडमुळे ईटीएफच्या किमती वास्तविक मूल्याच्या जास्तीत जास्त जवळ राहतील.

हा बदल केवळ धातूंच्या ईटीएफपुरता मर्यादित नसून, भविष्यात कर्ज आणि समभाग ईटीएफसाठीही लागू केला जाऊ शकतो. सेबीने या प्रस्तावावर मार्च २०२६ पर्यंत हरकती आणि सूचना मागवल्या आहेत.

## 'ग्रे मार्केट' म्हणजे काय?

**भांडवली बाजारात सध्या नवनवीन कंपन्यांच्या 'आयपीओ'ची (आरंभिक भागविक्री) मोठी लाट आली आहे. मुख्य प्रवाहात सेबीच्या नियमांनुसार व्यवहार होत असतानाच, पडद्यामागे एक अशी बाजारपेठ कार्यरत असते जिथे अधिकृत नोंदणीपूर्वीच समभागांची देवाणघेवाण सुरू होते. यालाच 'ग्रे मार्केट' असे म्हटले जाते. हे मार्केट अनधिकृत असूनही गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर आणि आयपीओच्या यशावर त्याचा मोठा परिणाम होतो.**

गुजरातस्थित अभियांत्रिकी क्षेत्रातील नामांकित कंपनी 'ओम्नीटेक इंजिनीअरिंग लिमिटेड'चा आयपीओ २५ फेब्रुवारीपासून गुंतवणूकदारांसाठी खुला होणार आहे. २७ फेब्रुवारीपर्यंत गुंतवणूकदारांना या प्रक्रियेत सहभाग घेता येईल. या भागविक्रीच्या माध्यमातून कंपनी सुमारे ५८३ कोटी रुपये उभारण्याचे उद्दिष्ट ठेवून आहे. विशेष म्हणजे, अधिकृत किंमत श्रेणी जाहीर होण्यापूर्वीच ग्रे मार्केटमध्ये या आयपीओबाबत सकारात्मक हालचाली पाहायला मिळत आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत कंपनीच्या महसुलात सुमारे ९२ टक्क्यांची वाढ होऊन तो ३४२ कोटी रुपयांवर पोहोचला आहे, तर नफ्यामध्ये १३२ टक्क्यांची मोठी झेप पाहायला मिळाली आहे. यामुळेच ग्रे मार्केटमध्ये सध्या १३ रुपये प्रीमियम दराने व्यवहार सुरू असल्याचे संकेत आहेत.



यानिमित्ताने ग्रे मार्केट म्हणजे नेमके काय, हे समजून घेणे रंजक आहे. जेव्हा एखादी कंपनी आपला आयपीओ जाहीर करते, तेव्हा त्या समभागांची अधिकृतरीत्या शेअर बाजारात नोंदणी झालेली नसते. मात्र, या मधल्या काळात गुंतवणूकदार आणि दलाल एकमेकांशी रोख रकमेच्या जोरावर व्यवहार करतात. हे व्यवहार पूर्णपणे विश्वासावर आधारलेले असतात आणि त्यांचा कोणताही कायदेशीर पुरावा नसतो. या बाजारात चालणाऱ्या भावाला 'ग्रे मार्केट प्रीमियम' अर्थात 'जीएमपी' असे म्हणतात. जर एखाद्या शेअरची मूळ किंमत १०० रुपये असेल आणि ग्रे मार्केटमध्ये तो १२० रुपयांना विकला जात असेल, तर त्याचा २० रुपये हा 'प्रीमियम' मानला जातो. हा आकडा त्या कंपनीबद्दल बाजारात किती उत्सुकता आहे, याचे निदर्शक असतो.

या समांतर बाजाराचा मुख्य आधार हा 'डिमांड आणि सप्लाय'चा नियम आहे. ज्या कंपन्यांचा व्यवसाय भक्कम असतो आणि ज्यांच्याबद्दल गुंतवणूकदारांमध्ये मोठी ओढ असते, अशा कंपन्यांचे जीएमपी गगनाला भिडतात.

अनेकदा छोटे गुंतवणूकदार केवळ या प्रीमियमकडे पाहून आयपीओमध्ये पैसे गुंतवण्याचा निर्णय घेतात. मात्र, हा रस्ता अत्यंत निसरडा आहे. ग्रे मार्केटमधील हालचाली अनेकदा कृत्रिमरित्या फुगवलेल्या असू शकतात.

बडे ऑपरेटर एखाद्या आयपीओची हवा निर्माण करण्यासाठी सुरुवातीला जीएमपी वाढवतात, जेणेकरून सामान्य गुंतवणूकदार त्यात अडकतील. एकदा आयपीओ पूर्ण भरला की हे भाव अचानक कोसळण्याची भीती असते.

ग्रे मार्केटमध्ये 'कोस्टक' दर हा आणखी एक महत्त्वाचा घटक असतो. आयपीओसाठी अर्ज करण्याच्या बदल्यात मिळणारी ही ठराविक रक्कम असते. समभाग मिळो वा न मिळो, अर्ज विकणाऱ्याला ही रक्कम दिली जाते. ही एक प्रकारे अर्जावर लावली जाणारी बोली असते. या सर्व व्यवहारांमध्ये रोख रकमेचा वापर होत असल्याने आणि त्यावर कोणत्याही संस्थेचे नियंत्रण नसल्याने, यात फसवणुकीची दाट शक्यता असते. जर लिस्टिंगच्या दिवशी शेअरचे भाव अपेक्षेनुसार न राहिल्यास, ग्रे मार्केटमधील सौदे पूर्ण करण्याची जबाबदारी केवळ त्या दलालाच्या विश्वासार्हतेवर अवलंबून असते.

थोडक्यात सांगायचे तर, ग्रे मार्केट हे बाजारातील उत्साहाचे मोजमाप करण्याचे एक अनधिकृत साधन आहे. गुंतवणूकदारांनी या प्रीमियमकडे केवळ एक संकेत म्हणून पाहावे, पण तोच गुंतवणुकीचा एकमेव निकष असू नये. कंपनीचा ताळेबंद, व्यवसायाचे स्वरूप आणि भविष्यातील विस्ताराच्या संधी यांचा विचार करूनच गुंतवणूक करणे हिताचे ठरते. ग्रे मार्केटमधील चमक ही अनेकदा क्षणभंगुर असू शकते, हे भान राखणे आवश्यक आहे.

## आर्थिक नियोजनाला 'फोमो'चा अडसर

राजेश आणि कीर्ती त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी गेल्या दहा वर्षांपासून पैसे वाचवत आहेत, परंतु ज्या कुटुंबात त्यांच्या मुलीचे लग्न होत आहे, त्यांचा विश्वास मोठ्या थाटामाटात लग्न करण्यावर आहे. कारण त्यांना समाजात ठराविक 'स्टेटस' राखायचे आहे. हर्षने केवळ आपल्या मित्रांच्या बरोबरीने राहण्यासाठी कर्ज काढून परदेश सहलीचा खर्च केला, कारण त्याच्या सर्व मित्रांनी सहली केल्या होत्या. त्याची आर्थिक ओढाताण (पगार कपात आणि वृद्ध पालकांची जबाबदारी) असूनही, त्याने केवळ इतरांमध्ये मिसळण्यासाठी हे कर्ज घेतले.

फोमो (फीअर ऑफ मिसिंग आऊट) म्हणजेच 'काहीतरी राहून जाण्याची भीती', हा घटक आजकाल लोकांच्या जीवनशैलीवरील खर्चाचा मुख्य आधार बनला आहे. यामुळे अनेकदा आवेगपूर्ण खर्च (इम्पल्सिव्ह स्पेंडिंग) होतो, ज्यामुळे बचतीत घट होते आणि कर्ज वाढते, परिणामी दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे धोक्यात येतात. सोशल मीडिया या आगीत तेलाचे काम करते, जिथे लोक आपली सजवलेली जीवनशैली दाखवतात आणि इतरांना त्यांच्यासारखे खर्च करण्याचा दबाव जाणवतो.

केवळ मोठे खर्चच नाही, तर दररोजचे छोटे खर्च जसे की आलिशान हॉटेल्समध्ये जेवणे, हे देखील आर्थिक गणित बिघडवू शकतात. वाढत्या उत्पन्नामुळे लोकांची जीवनशैली बदलली आहे आणि ज्या गोष्टी पूर्वी चैनीच्या होत्या, त्या आता गरज बनल्या आहेत. फोमोला बळी पडू नये यासाठी बजेट (अंदाजपत्रक) पाळणे अत्यंत आवश्यक आहे.




बजेट तुम्हाला खर्चाची दिशा ठरवून देते; ते खर्च करण्यापासून रोखत नाही, तर आर्थिक नियोजन न बिघडवता कुठे खर्च करायचा हे ठरवण्यास मदत करते. आपल्या बजेटमध्ये दैनंदिन खर्चासोबतच सहली आणि जीवनशैलीसाठी स्वतंत्र तरतूद करणे आर्थिक भविष्यासाठी महत्त्वाचे आहे.

मुळात पैसे खर्च करणे ही समस्या नाही, तर केवळ इतरांमध्ये मिसळण्यासाठी किंवा दिखावा करण्यासाठी आपल्या क्षमतेबाहेर खर्च करणे ही खरी समस्या आहे. जोपर्यंत माणूस आपल्या कुवतीनुसार खर्च करतो (कटिंग द कोट ॲकॉर्डिंग वन्स साइझ) तोपर्यंत तो आर्थिकदृष्ट्या सुरक्षित असतो.

**- राहुल शहा,** मुंबई

## फॉर्म नंबर १६ इतिहासजमा?

**नव्या आयकर कायद्याचा 'फॉर्म्युला'** : बदलत्या क्रमांकांचा आणि सुटसुटीत करप्रणालीचा नवा अध्यायभारतीय करप्रणालीत १ एप्रिल २०२६ पासून एक मोठे स्थित्यंतर घडून येणार आहे. केंद्र सरकार 'नवा आयकर अधिनियम' लागू करण्याच्या तयारीत असून, यामुळे केवळ कर आकारणीचे नियमच बदलणार नाहीत, तर गेल्या अनेक दशकांपासून आपल्या परिचयाचे असलेल्या कर अर्जांचे संपूर्ण रूपच पालटणार आहे.




कर भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि डिजिटल युगाला साजेशी करण्यासाठी सरकारने हा धाडसी निर्णय घेतला आहे.

आजवर नोकरदार वर्गासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'फॉर्म १६' आता इतिहासजमा होणार असून, त्याची जागा 'फॉर्म १३०' घेणार आहे. केवळ नावाचा बदल नसून, फॉर्म्सची ही नवीन क्रमवारी अधिक तर्कसंगत बनवण्यात आली आहे. उदाहरणार्थ, आता १३० ते १५० या श्रेणीतील सर्व फॉर्म्स हे 'टीडीएस'शी संबंधित असतील, ज्यामुळे सर्वसामान्य करदात्याला आपला नेमका फॉर्म शोधणे सोपे जाईल.

या नव्या सुधारणेनुसार, करदात्याच्या वार्षिक उलाढालीचा आरसा मानला जाणारा 'फॉर्म २६एएस' आता 'फॉर्म १६८' या नावाने ओळखला जाईल.

बँका आणि इतर वित्तीय संस्थांकडून होणाऱ्या व्यवहारांची माहिती आता फॉर्म ६१ए ऐवजी फॉर्म १६५ मध्ये समाविष्ट केली जाईल.

परदेशात पैसे पाठवण्यासाठी लागणारा '१५सीए' हा फॉर्म आता '१४५' होणार आहे. या बदलांमुळे कर संकलनाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि त्रुटीमुक्त होण्यास मदत होईल.

नव्या आयकर कायद्याचा मुख्य उद्देश हा डिजिटल फ्रेंडली वातावरण निर्माण करणे हा आहे. सध्याच्या घडीला टॅक्स ऑडिटसाठी वेगवेगळे फॉर्म भरावे लागतात, मात्र नव्या नियमावलीत फॉर्म २६ अंतर्गत या सर्व माहितीचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे एकाच माहितीची पुनरावृत्ती टाळता येईल. तसेच, नवीन प्रणालीमुळे आयटीआर फॉर्ममध्ये अनेक माहिती आधीच भरलेली येईल, ज्यामुळे कर भरताना होणाऱ्या चुकांचे प्रमाण नगण्य होईल.

जुन्या ३सीए, ३सीबी यांसारख्या क्लिष्ट नावांपेक्षा 'लॉजिकल सिक्वेन्स'मध्ये असलेल्या क्रमांकांमुळे कर सल्लागार आणि सामान्य नागरिक या दोघांमधील संवाद अधिक स्पष्ट होईल.

सरकारने या बदलांचा मसुदा जाहीर करून जनतेकडून सूचना मागवल्या आहेत, जेणेकरून ही नवी व्यवस्था अंमलात येताना कोणतीही अडचण येऊ नये.

## आयटी क्षेत्रातील घसरण आणि म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांची धास्ती

भारतीय भांडवल बाजारात गेल्या दोन दशकांपासून माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्राने गुंतवणूकदारांना मालामाल केले आहे. मात्र, २०२४ ते २०२६ या काळात या क्षेत्रासमोर अभूतपूर्व आव्हाने उभी राहिली आहेत. विशेषतः 'चॅटजीपीटी' सारख्या प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आगमनानंतर, आयटी कंपन्यांच्या पारंपारिक व्यवसाय प्रारूपावर (बिझनेस मॉडेल) प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. 'इकॉनॉमिक टाइम्स'च्या ताज्या आकडेवारीनुसार, निफ्टी आयटी निर्देशांकात झालेली घसरण ही केवळ तांत्रिक नसून ती एका मोठ्या बदलाची नांदी मानली जात आहे. याचा थेट परिणाम सामान्य गुंतवणूकदारांच्या 'एसआयपी'वर (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) कसा होणार, हे समजून घेणे आज काळाची गरज आहे.



### आकडेवारी काय सांगते?

बाजारातील ताज्या आकडेवारीनुसार, भारतीय आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांच्या नफ्यात गेल्या आर्थिक वर्षात सरासरी ८ ते १२ टक्क्यांची घट नोंदवण्यात आली आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस), इन्फोसिस आणि विप्रो यांसारख्या कंपन्यांच्या 'बेंचमार्क' परताव्यामध्ये मोठी अस्थिरता दिसून आली आहे. गेल्या एका वर्षात जिथे निफ्टी ५० ने सकारात्मक वाढ दर्शवली, तिथे आयटी निर्देशांकाने अनेकदा नकारात्मक किंवा सपाट कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, परकीय संस्थागत गुंतवणूकदारांनी (एफआयआय) आयटी शेअर्समधून आपला हिस्सा कमी करून तो बँकिंग आणि उत्पादन क्षेत्राकडे वळवला आहे. ही आकडेवारी स्पष्ट करते की, मोठ्या गुंतवणूकदारांचा या क्षेत्रावरील विश्वास सध्या डळमळीत झाला आहे.

'एआय'चा वाढता प्रभाव आणि रोजगाराचे संकट

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आयटी कंपन्यांकडे काम नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. पूर्वी ज्या कामासाठी १०० कोडिंग तज्ज्ञांची गरज लागायची, तेच काम आता 'एआय'च्या मदतीने अवघे १० ते १५ लोक करू शकतात. यामुळे कंपन्यांच्या महसुलावर परिणाम होत आहे, कारण भारतीय आयटी क्षेत्राचा मुख्य स्त्रोत हा 'मॅन-अवर' (माणशी कामाचे तास) बिलिंग आहे. जर काम कमी वेळेत पूर्ण झाले, तर कंपन्यांना क्लायंटकडून मिळणारे पैसेही कमी होतात. या 'एआय' संकटामुळे गुंतवणूकदारांमध्ये भीती आहे की, आगामी काळात या कंपन्यांच्या 'ऑपरेटिंग मार्जिन'मध्ये ४०० ते ६०० बेसिस पॉईंट्सची घट होऊ शकते.

### म्युच्युअल फंड पोर्टफोलिओवरील परिणाम

भारतातील बहुतांश लार्ज कॅप आणि फ्लेक्सि कॅप म्युच्युअल फंड योजनांमध्ये आयटी क्षेत्राचे वजन (वेटेज) साधारणपणे १० ते १५ टक्के असते. काही विशेष 'टेक्नॉलॉजी फंडांमध्ये' तर हे प्रमाण ८० टक्क्यांच्या वर असते. जेव्हा आयटी क्षेत्रात घसरण होते, तेव्हा या फंडांचे 'नेट ॲसेट व्हॅल्यू' (एनएव्ही) खाली येते. आकडेवारीनुसार, गेल्या सहा महिन्यांत अनेक आघाडीच्या फंडांनी आयटीमधील आपली गुंतवणूक ३ ते ४ टक्क्यांनी कमी केली आहे. ज्या गुंतवणूकदारांनी केवळ आयटी क्षेत्राच्या जोरावर ५ ते १० वर्षांचे आर्थिक उद्दिष्ट ठेवले होते, त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये आता अपेक्षित परताव्यापेक्षा २ ते ३ टक्के कमी वाढ दिसून येत आहे.

### एसआयपी गुंतवणूकदारांनी काय करावे?

म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांसाठी 'कॉस्ट ॲव्हरेजिंग' हा मोठा फायदा असतो. जेव्हा मार्केट पडते, तेव्हा एसआयपीच्या माध्यमातून अधिक 'युनिट्स' खरेदी केले जातात. मात्र, जर एखाद्या क्षेत्राची मंदी ही संरचनात्मक (स्ट्रक्चरल) असेल, तर केवळ युनिटस् वाढून उपयोग नसतो. गुंतवणूकदारांनी आपल्या पोर्टफोलिओमध्ये 'सेक्टरल डायव्हर्सिफिकेशन' करणे आवश्यक आहे. जर तुमच्या पोर्टफोलिओमध्ये आयटी क्षेत्राचा वाटा २० टक्क्यांहून अधिक असेल, तर तो कमी करून फार्मा किंवा इन्फ्रास्ट्रक्चरसारख्या क्षेत्रांकडे वळवण्याचा विचार करणे योग्य ठरेल. सध्याच्या काळात 'बॅलन्स्ड ॲडव्हांटेज फंड' किंवा 'मल्टी ॲसेट वाटप' असलेल्या योजना अधिक सुरक्षित मानल्या जात आहेत.

### दीर्घकालीन दृष्टिकोन आणि सुधारणेची आशा

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. काही तज्ज्ञांच्या मते, ही घसरण म्हणजे 'एआय'मुळे आलेली तात्पुरती भीती आहे. भारतीय कंपन्या सध्या 'एआय' तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत. एकदा का या कंपन्यांनी स्वतःला 'एआय-फर्स्ट' कंपन्यांमध्ये रूपांतरित केले, तर पुन्हा एकदा नफ्याचा आलेख उंचावू शकतो. क्लाउड कॉम्प्युटिंग आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रांत अजूनही मोठी संधी आहे. त्यामुळे ज्या गुंतवणूकदारांचा काळ १० वर्षांहून अधिक आहे, त्यांनी घाबरून एसआयपी बंद करू नये. संयम हाच शेअर बाजारातील यशाचा मूळ मंत्र आहे, हे विसरून चालणार नाही.

# कर्ज वसुली ही कला; कायदा, समजूत आणि तडजोड यांची त्रिसूत्री महत्त्वाची

**नवनाथ जगताप यांचे प्रतिपादन; मार्च एण्डच्या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकांसाठी कर्जवसुली व्यवस्थापन प्रशिक्षण; 'कायद्याचे शस्त्र आणि मानवी दृष्टिकोन' यांचा समतोल साधण्याचा संदेश**

नगर – कर्ज वसुली ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून ती एक कला आहे. कायद्याचे शस्त्र हातात ठेवून, समोरच्या व्यक्तीची परिस्थिती व भावना समजून घेत आणि आवश्यकतेनुसार तडजोडीची भूमिका स्वीकारत वसुली केल्यास अधिक परिणामकारक यश मिळते, असे प्रतिपादन बारामती सहकारी बँकेचे वसुली अधिकारी नवनाथ जगताप यांनी केले.

अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने मार्च एण्डच्या पार्श्वभूमीवर कर्जदारांकडून सामंजस्याच्या भूमिकेतून प्रभावी कर्ज वसुली व्हावी यासाठी 'कर्जवसुली व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जगताप बोलत होते.कार्यक्रमाचे उद्घाटन कोपरगाव पीपल्स बँकेचे चेअरमन सुनील बंब यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी असोसिएशनचे चेअरमन सत्येन मुंदडा, व्हाइस चेअरमन शिवाजीराव व्यवहारे, अंबिका महिला बँकेच्या संचालिका आशाताई मिश्किल, संध्याताई जाधव तसेच जिल्ह्यातील विविध नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



नागरी सहकारी बँकांसाठी कर्जवसुली व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करताना सुनील बंब.

पुढे आपल्या मार्गदर्शनात नवनाथ जगताप यांनी कर्जदारांचे तीन प्रकार स्पष्ट केले. क्षमता आहे, पण इच्छा नाही अशा कर्जदारांना कायद्याचा धाक दाखवून कर्जफेडीची मानसिकता तयार करावी लागते. इच्छा आहे, पण क्षमता नाही हे कर्जदार अडचणीत आलेले असतात. त्यांची परिस्थिती समजून तडजोडीची भूमिका घ्यावी लागते. ना इच्छा, ना क्षमता अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर प्रक्रिया, जप्ती आणि लिलाव करून वसुली करावी लागते.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत सहकारी बँकांना कर्ज वसुलीसाठी प्रभावी अधिकार प्राप्त झाले आहेत. या कायद्यातील तरतुदींचा योग्य वापर केल्यास बँकांची थकबाकी कमी होण्यास मदत होते. जमीनदार व महसूल प्रशासनाच्या माध्यमातूनही चांगली वसुली साधता येते. मात्र, वसुली करताना समोरच्या व्यक्तीच्या भावना व परिस्थिती लक्षात घेतल्यास प्रक्रिया अधिक सुलभ होते, असे त्यांनी नमूद केले.

असोसिएशनचे चेअरमन सत्येन मुंदडा यांनी प्रास्ताविकात सांगितले की, मार्च एण्ड हा बँकिंग क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा काळ असतो. थकबाकी कमी करणे, आर्थिक शिस्त राखणे आणि बँकेचा ताळेबंद मजबूत ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. मात्र कर्ज वसुली करताना कर्जदार आणि वसुली अधिकारी यांच्यातील वाद विकोपाला जाऊ नयेत, यासाठी शिस्तबद्ध, संवेदनशील आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धात्मक वातावरणात सहकारी बँकांनी व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून अधिकारी सक्षम झाले, तर वसुलीची प्रक्रिया अधिक परिणामकारक व सुसंवादी होईल. याच उद्देशाने हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुनील बंब म्हणाले की, सहकारी बँका या ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. कर्जवाटप जितके महत्त्वाचे, तितकीच कर्ज वसुलीही महत्त्वाची आहे. बँकांची आर्थिक शिस्त राखण्यासाठी सक्षम वसुली व्यवस्थापन आवश्यक आहे. कायद्याचे ज्ञान, संवाद कौशल्य आणि मानवी दृष्टिकोन या त्रिसूत्रीवर आधारित वसुलीच यशस्वी ठरते. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपली कौशल्ये वाढविली, तर बँकांची पत अधिक बळकट होईल. जिल्ह्यातील सर्व नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींनी या प्रशिक्षणाला प्रतिसाद दिला, ही आनंदाची बाब असल्याचे ते म्हणाले.

# चार्टर्ड अकौंटंट परिक्षेत युवराज कोठारी उत्तीर्ण

श्रीरामपूर – इन्स्टीट्युट ऑफ चार्टड अकोटंट या संस्थेने जानेवारी २०२६ मध्ये घेतलेल्या सी. ए. परिक्षेत युवराज कोठारी हा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. तो ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी यांचा नातु तर मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष राहुल कोठारी व आनंद जैन पाठशाळेचे शिक्षीका सौ. लिना कोठारी यांचा तो मुलगा आहे.



युवराजचे प्राथमिक शिक्षण सेंट झेविअर्स स्कुल, श्रीरामपूर व ११ वी, १२ वी व बी. कॉम पर्यंतचे शिक्षण चंद्ररुप डाकले कॉलेज ऑफ कॉमर्स येथे झाले आहे.

युवराज यास सी.ए. फौडेंशन परिक्षेसाठी राजस्थान मधील जोधपुर येथील बलवंत सेमलाणी यांच्या बी. आर. जैन क्लासेस मार्गदर्शन लाभले. ही परिक्षा तो उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाला होता. तसेच आर्टिकलशिप साठी पुणे येथील एस.पी.सी.एम. ॲण्ड असोसिएटस्चे अभय बोरा व सुहास बोरा यांचे मार्गदर्शन लाभले.

सी.ए. परिक्षेसाठी युवराज कोठारी यांस औरंगाबादचे सी.ए. अतुल कोठारी, त्याचे वडील सिव्हील इंजिनिअर राहुल कोठारी, आत्या सौ. हर्षाली शिंगवी व प्रशांत शिंगवी, पुणे व ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी तसेच कोठारी परिवाराचे यांचे मार्गदर्शन लाभले होते.



महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या उपाध्यक्षपदी अविनाश घुले यांची निवड झाल्यानंतर राज्यातील पदाधिकारी यांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला

# महाराष्ट्र हमाल मापाडी महामंडळाच्या उपाध्यक्षपदी अविनाश घुले यांची निवड

नगर – महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळचे अध्यक्ष स्वर्गीय बाबा आढाव यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदाच्या जागेवर पुणे येथे महामंडळाची राज्य कार्यकारिणी बैठक पार पडली. या बैठकीत अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले यांची राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. स्व. आढाव यांच्या स्मृतींना अभिवादन करून बैठकीस प्रारंभ करण्यात आला.



बैठकीत अध्यक्षपदी विदर्भातील डॉ. बाबा आढाव यांचे सहकारी डॉ. हरीश धुरट यांची निवड करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष अविनाश घुले यांच्यासह बेठकीस राजकुमार घायाळ (बीड), विकास मगदूम (सांगली), हुसेन पठाण (पुणे), आप्पा खताळ (धुळे), शिवाजीराव शिंदे (सोलापूर), हनुमंत बहिरट (पुणे), शेख हसन कादरी (अकोला), गंगाराम कोळेकर (धुळे), कृष्णा चौगुले (कोल्हापूर), गोरख मेंगडे (पुणे), सूर्यकांत स्वामी (नांदेड), जिल्हा हमाल पंचायतीचे उपाध्यक्ष गोविंदराव सांगळे, माथाडी पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले आदी राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवजयंती जयंतीनिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धेचे निकाल जाहीर

नगर – हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नगर–कल्याण रोडवरील फॅमिली विश्व मॉल येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. देशभक्तीमय वातावरणात पार पडलेल्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.



शिवजयंती जयंतीनिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आले.

इयत्ता १ ली ते ४ थी व ५ वी ते ९ वी अशा दोन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील पराक्रम, राज्याभिषेक सोहळा, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, गड–किल्ल्यांचे वैभव आदी विषयांवर आधारित आकर्षक चित्रे साकारली. पालक, शिक्षक व उपस्थित नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व कलागुणांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम उपस्थित होते. तसेच विश्व मॉलचे संचालक पारूनाथ ढोकळे, परशुराम कोतकर, आदर्श शिक्षक सुनील जोरवेकर, चित्रकार शिक्षक हेमंत विरणकर, प्रताप गडाख, हर्षल शिंदे आदींची उपस्थिती लाभली व त्यांचे सत्कार करण्यात आले.

यावेळी बोलताना संभाजी कदम म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे प्रेरणेचे जिवंत प्रतीक आहेत. त्यांच्या कार्यातून राष्ट्रभक्ती, शौर्य आणि स्वाभिमानाची शिकवण मिळते. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाण आणि सर्जनशीलता वाढीस लागण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आयोजक विभाग प्रमुख शिवसेना शिंदे गट आर्किटेक प्रणव अशोकराव भोसले यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात आले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

स्पर्धेचे निकाल – इयत्ता १ ली ते ४ थी गट : प्रथम – यश राजकुमार (₹१००० + सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र), द्वितीय – आराध्या खेडके (₹७०० + सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र), तृतीय – रुद्राक्ष बिडकर (₹५०० + सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र), उत्तेजनार्थ – विराज काजरे (प्रमाणपत्र)

इयत्ता ५ वी ते ९ वी गट : प्रथम – सृष्टी भिंगारे (₹१००० + सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र), द्वितीय – सान्वी लोणकर (₹७०० + सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र), तृतीय – श्रावणी मायकर (₹५०० + सन्मानचिन्ह + प्रमाणपत्र), उत्तेजनार्थ – वेदांत पवार (प्रमाणपत्र)

# मन्नान शेख याचा रमजानचा रोजा

नगर – मन्नान ओवेस शेख (वय ४) या चिमुकल्याने पवित्र रमजानचा पहिला रोजा (उपवास) केला. तो इंग्रजी शाळेत इयत्ता ज्युनिअर के. जी. मध्ये शिकत आहे. कडक उन्हातही त्याने रोजा धरल्याने त्याचे कौतूक होत आहे. मन्नान शेख हा पत्रकार सरवर तांबटकर यांचा नातू आहे. मन्नान हा अभ्यासात खूप हुशार असून, पुस्तकातील धडे त्याला तोंडपाठ आहेत.



# हन्नान शेख याचा रमजानचा रोजा


नगर – हन्नान ओवेस शेख याने पवित्र रमजानचा पहिला रोजा धरला. तो इंग्रजी शाळेत इयत्ता पहिलीत शिकत आहे.



अवघ्या सहा वर्षाचा तो असून, अभ्यासात व खेळातही पहिला येतो. त्याचे समाजातून कौतूक करण्यात येत आहे. तो पत्रकार सरवर तांबटकर यांचा नातू आहे.

# महापुरुषांच्या अवमानप्रकरणी हरजितसिंह वधवा यांची तक्रार, मंत्रालयाकडून दखल; प्रशासकीय पातळीवर चौकशीला सुरुवात

नगर – हरियाणा राज्यातील मिलन बॅन्क्वेट हॉल येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमांचा वापर स्वच्छतागृह दर्शक (टॉयलेट साइनबोर्ड) म्हणून करण्यात आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणी संतापाची लाट उसळली आहे. राष्ट्रातील महान व्यक्तिमत्त्वांचा अशा प्रकारे अवमान झाल्याचा आरोप करत शहरातील हरजितसिंह वधवा यांनी संबंधित प्रकरणी औपचारिक तक्रार दाखल केली आहे.




माहितीनुसार, सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडिओमध्ये संबंधित बॅन्क्वेट हॉलमध्ये स्वच्छतागृह दर्शविण्यासाठी शिवराय आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमा लावण्यात आल्याचे दिसत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये सोशल मीडियाद्वारे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती. या प्रकरणी हरजितसिंह वधवा यांनी पुढाकार घेऊन हरियाणा पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री कार्यालय, सांस्कृतिक कार्य विभाग आणि गृह विभाग यांना ई–मेलद्वारे तक्रार नोंदविली आहे. तक्रारीत संबंधित घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



त्यानंतर मुख्यमंत्री सचिवालय, महाराष्ट्र यांनी या तक्रारीची अधिकृत दखल घेत ती संबंधित विभागाकडे कार्यवाहीसाठी पाठविल्याची माहिती देण्यात आली. तसेच महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग यांनी तक्रार प्राप्त झाल्याची नोंद करून तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिल्याचे कळविण्यात आले आहे.

पुढील टप्प्यात महाराष्ट्र शासन गृह विभाग यांनीही सदर प्रकरण 'तत्काळ' म्हणून चिन्हांकित करून संबंधित पोलिस अधिकाऱ्यांकडे आवश्यक ती कारवाई करण्यासाठी पाठविले असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत हरजितसिंह वधवा यांनी सांगितले की, प्रशासकीय पातळीवर विषय गांभीर्याने घेतला गेला असून पुढील चौकशीची प्रक्रिया सुरू आहे. जरी हरियाणा पोलिसांकडून अद्याप अधिकृत प्रतिसाद प्राप्त झालेला नसला तरी राज्यस्तरावर या विषयाची दखल घेतली गेल्यामुळे प्रकरणाला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर केवळ सोशल मीडियावर भावना व्यक्त करण्यापेक्षा संवैधानिक व कायदेशीर मार्गाने तक्रार केल्यास शासन यंत्रणा दखल घेते आणि कार्यवाहीची प्रक्रिया सुरू होते, हे या प्रकरणातून स्पष्ट झाल्याचे मत वधवा यांनी व्यक्त केले. सदर प्रकरणाची चौकशी सुरू असून संबंधित प्रशासनाने वस्तुस्थितीची पडताळणी करून योग्य ती कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# 'आदर्श कुलोपाध्याय' पुरस्कारांचे वितरण

नगर – श्री समर्थ मंडळ ऋग्वेद भवन, अहिल्यानगर यांच्या वतीने व कै. सिध्देश्वर एकनाथ तथा सिदूकाका धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वरी निरूपणकार ह.भ.प. नीळकंठ देशमुख हे होते. श्री समर्थ मंडळ यांच्या वतीने दिला जाणारा आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार या वर्षी कल्पतरू मठाचे मठाधिपती वे.शा.सं विनायक धर्माधिकारीव वे.शा.सं. सागर कुलकर्णी (घनपाठी) यांना ज्ञानेश्वरी निरूपणकार ह.भ.प. नीळकंठ देशमुख यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. श्री समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश अ. क्षीरसागर, सौ.धर्माधिकारी, सौ.कुलकर्णी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.



श्री समर्थ मंडळ ऋग्वेद भवन अहिल्यानगर यांच्या वतीने व कै. सिध्देश्वर एकनाथ तथा सिदूकाका धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थदिला जाणारा आदर्श कुलोपाध्याय पुरस्कार २०२६ कल्पतरू मठाचे मठाधिपती वे.शा.सं विनायक अनंत धर्माधिकारी व वे.शा.सं. सागर कुलकर्णी यांना ज्ञानेश्वरी निरूपणकार ह.भ.प. नीळकंठ देशमुख यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. (छाया – उदय जोशी)

सौ. धर्माधिकारी आणि सौ. कुलकर्णी यांचा सत्कार सौ. बेदरे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्तविक समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश अ. क्षीरसागर यांनी केले. दोन्ही पुरस्काथीचा परीचय समर्थ मंडळाचे विश्वस्त मिलिंद जोशी यांनी करून दिला. ह.भ.प. नीळकंठ देशमुख यांचा परीचय समथ मंडळाचे खजिनदार पुरूषोत्तम बेदरे यांनी करून दिला.

धर्माधिकारी परिवाराचे मनोगत हेमंत धर्माधिकारी यांनी पुरस्कारामागची भूमिका मांडली. कार्यक्रमास पुरोहित वर्ग व सभासद उपस्थित होते. मानपत्र लेखन व वाचन ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन समथ मंडळाचे सचिव महेश रा. कुलकर्णी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व कार्यकारणी सदस्यांनी प्रयत्न केले. सौ. स्नेहल उपाध्ये यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. समर्थ मंडळाचे विश्वस्त रविंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले.

खजिनदार पुरूषोत्तम बेदरे, कार्यकारिणी सदस्य रविंद्र कुलकर्णी, यशवंत आंबेकर, मिलिंद जोशी, माजी नगरसेवक महेंद्र गंधे, वे. शा. सं. चकोर मुळे, बंडोपंत मुळे, रेखी गुरू, जोशी गुरू, प्रदुम्न जोशी, सोमनाथ मुळे, ॲड. अच्युतराव पिंगळे, धर्माधिकारी आणि कुलकर्णी परीवाराचे नातेवाईक तसेच मुकुल गंधे, अनंत कुलकर्णी, वाल्मीक कुलकणी, सौ. कालिंदी केसकर, रविंद्र धर्माधिकारी, उपेंद्र धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

# मराठी माणसेच मराठी भाषेचे गौरवविधाते : प्रा.मेधा काळे

नगर – आम्हा मराठी भाषेला संस्कृतीला हजारो वर्षाची परंपरा आहे. जागतिकीकरणाचे वारे सर्वत्र वाहत असताना आमच्या माय मराठीचे नाव साता समुद्र पार जाण्यासाठी आम्ही मराठी माणसांनीच आपल्या बोलण्यात, वाचण्यात, लिहिण्यात तिचा अंगीकार केला तर आम्हीच मराठी भाषेचे गौरव विधाते होऊ असा आशावाद जेष्ठ साहित्यिका प्रा. मेधा काळे यांनी व्यक्त केला.



वि. वा. शिरवाडकर तथा लेखक कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी भाषा गौरव दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित पुस्तक रसग्रहण व चारोळ्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी प्राध्यापिका मेधा काळे आदी.

वि.वा.शिरवाडकर तथा लेखक कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी भाषा गौरव दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित पुस्तक रसग्रहण व चारोळ्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी प्राध्यापिका काळे बोलत होत्या.

कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, संचालिका शिल्पा रसाळ, संचालक किरण आगरवाल, पुस्तक रसग्रहण व चारोळी स्पर्धेच्या परीक्षक रेघोट्याच्या निर्मात्या सौ. साधना कसपटे – महानुर, ग्रंथपाल अमोल इथापे, सौ. शामल महानूर, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल आदींसह सभासद उपस्थित होते.

अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांनी प्रास्ताविकात वाचनालय आणि पुस्तके यांची भाषा संवर्धनात मोठी भूमिका आहे. सुमारे दोन शतके हा वारसा अहिल्यानगर जिल्हा वाचनालय हवेलीतपणे चालू आहे. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन कृतीतून, वाचण्यातून ही माय मराठी समृद्ध करावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

चारोळी स्पर्धेच्या परीक्षिका सौ.साधना कसपटे– महानूर यांनी मनोगतात आपण सातत्याने पुस्तके वाचले तर आपला शब्द संग्रह, कल्पनाशक्ती व ज्ञान यांनी वाचक समृद्ध होतो. यातूनच पुढे मराठीतून चांगला सुसंवाद, लेखन व आपसुकच मराठी भाषा ही समृद्ध होईल. त्यासाठी आपण रोजच्या जीवनात दर्जेदार पुस्तकांचे वाचन, मराठीचा जाणीवपूर्वक सुसंवाद प्रत्येकाची भूमिका आणि जबाबदारी महत्त्वाची असल्याचे सांगितले.

यावेळी चारोळी स्पर्धेतील विजेते प्रथम –संकेत फाटक, द्वितीय– तनिषा शाह, तृतीय– दत्ता पवार, उत्तेजनार्थ सुरेखा घोलप, अजय शुक्ल, संजय सोनवणे यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रा. शिरीष मोडक, शिल्पा रसाळ, किरण आगरवाल यांच्या हस्ते पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालिका शिल्पा रसाळ यांनी केले. अमोल इथापे यांनी आभार मानले. यावेळी स्पर्धेतील स्पर्धक वाचक तसेच वाचनालयाचे कर्मचारी सौ. वर्षा जोशी, संजय गाडेकर, आर्यन मडूर, शेख सिकंदर यांचे सहकार्य लाभले.

# अहिल्यानगर येथील पै. नाना डोंगरे यांना पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार जाहीर



नगर – तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने पै. नाना डोंगरे यांना पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या सन्मान सोहळ्यात डोफ्लगरे यांना पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष जावेद शेख व फारुख शेख नौमानी यांनी दिली.

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन डोंगरे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे. स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जनजागृती मोहीम, रक्तदान शिबिरे यांसारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविले जात आहेत. युवकांसाठी व्यसनमुक्ती संदर्भातील कार्यक्रम, तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्यसेवा देण्याचे कार्यही संस्थेमार्फत सुरू आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, युवा संमेलनांच्या आयोजनातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.

साहित्य चळवळीला चालना देण्यासाठी पै. नाना डोंगरे यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत.

